स्थापना : सन १९५४

वर्ष ७३ वे

# सचिवालय जिमखाना मुंबई

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य, मुंबई (७७९-१९९७ जी.बी.बी.एस.डी.)

नोंदणी क्र. महाराष्ट्र राज्य, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था एफ - २४७३८ मुंबई

## ७३ वा वार्षिक अहवाल

(२०२५-२६)




६, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई - ४०० ०३२. • दूरध्वनी: ०२२-३५६४५३५६

Email: sachivalayagym1954@gmail.com / sachivalayagym@rediffmail.com

Website: www.sachivalayagymkhana.com Facebook Page: Sachivalaya Gymkhana, Mumbai.

# सचिवालय जिमखाना

## व्यवस्थापकीय समिती

### २०२५-२६



ना. श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य
व पदसिध्द अध्यक्ष



श्री. राजेश अग्रवाल
मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
व पदसिध्द उपाध्यक्ष



श्री. सतीश जोंधळे
सभापती



श्री. अरविंद शेटे
उपसभापती



श्री. सुनिल आगरकर
मानद महासचिव



श्री. सतीश सोनवाने
मानद खजिनदार



श्रीमती मंगल नाखवा
मानद सह सचिव



श्री. मकरंद गयावळ
मानद सह सचिव



श्री. संजय पोफळे
मानद सचिव



श्री. संजय कदम
मानद सचिव



श्रीमती अपर्णा जाधव
मानद सचिव



श्री. मारुती कवालदार
मानद सचिव



श्री. जयदीप कामत
मानद सचिव



श्री. प्रविण मुंढे
मानद सचिव



श्री. प्रताप माडकर
मानद सचिव



श्रीमती वैशाली सुळे
मानद सचिव



श्री. चेतन चव्हाण
मानद सचिव

स्थापना : १९५४

# सचिवालय जिमखाना, मुंबई

## व्यवस्थापकीय समिति २०२५-२६

**★ पदसिध्द अध्यक्ष ★**

श्री. देवेंद्र फडणवीस, मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

**★ पदसिध्द उपाध्यक्ष ★**

श्री. राजेश कुमार, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य (१ जुलै, २०२५ ते ३० नोव्हें. २०२५ पर्यंत)

श्री. राजेश अग्रवाल, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य (१ डिसें. २०२५ पासून)

| | | |
|---|---|---|
| **सभापती** | : | श्री. सतीश जोंधळे |
| **उपसभापती** | : | श्री.अरविंद शेटे |
| **मानद महासचिव** | : | श्री. सुनिल आगरकर |
| **खजिनदार** | : | श्री. सतीश सोनवाने |
| **मानद सह सचिव** | : | श्रीमती मंगल नाखवा |
| | : | श्री. मकरंद गयावळ |
| | : | श्री. संजय पोफळे |

**★ सभासद ★**

श्री. संजय कदम, श्रीमती अपर्णा जाधव, श्री. मारुती कवालदार, श्री. जयदीप कामत, श्री. प्रविण मुंढे, श्री. प्रताप माडकर, श्रीमती वैशाली सुळे, श्री. चेतन चव्हाण.

**★ बँकर्स ★**

भारतीय स्टेट बँक, नरीमन पॉईन्ट, मुंबई.

दि महाराष्ट्र मंत्रालय आणि अलाईड ऑफिसेस को.ऑप. बँक लि., मंत्रालय, मुंबई.

बँक ऑफ बडोदा, नरीमन पॉईन्ट शाखा, मुंबई.

बँक ऑफ महाराष्ट्र, मंत्रालय, मुंबई.

**★ हिशोब तपासनीस ★**

मे. दिनेश हुमणे ॲण्ड कंपनी, चार्टड अकांऊटंट, ७-ए/१, एन. एम. एम. सोसायटी, कळवा (प), ठाणे- ४०० ६०५.

# सचिवालय जिमखाना

## वार्षिक अहवाल २०२५-२६

### प्रपत्र -१

**व्यवस्थापकीय समितीच्या २०२५-२६ यावर्षी झालेल्या एकूण सभा व उपस्थिती सभासदांची संख्या**

| कार्यकारी समितीच्या सभासदांचे नाव (१) | सभासदांचा कालावधी (२) | समितीच्या सभांची संख्या (३) | सभासद उपस्थिती राहिलेल्या सभांची संख्या (४) |
|---|---|---|---|
| श्री. सतीश जोंधळे (स्वीकृत) | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | १२ |
| श्री. अरविंद शेटे | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | ११ |
| श्री. सुनिल आगरकर | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | १२ |
| श्री. सतीश सोनवाने | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | ११ |
| श्रीमती मंगल नाखवा | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | ११ |
| श्री. मकरंद गयावळ | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | १० |
| श्री. संजय पोफळे | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | ११ |
| श्री. संजय कदम | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | ९ |
| श्रीमती अपर्णा जाधव | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | १२ |
| श्री. मारुती कवालदार | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | ८ |
| श्री. जयदीप कामत | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | ११ |
| श्री. प्रविण मुंढे | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | ११ |
| श्री. प्रताप माडकर | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | १२ |
| श्रीमती वैशाली सुळे सदस्य (स्वीकृत) | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | ३ |
| श्री. चेतन चव्हाण सदस्य (स्वीकृत) | १.३.२०२५ ते ३१.३.२०२६ | १२ | ५ |

## सूचना

सचिवालय जिमखान्याची ७३वी वार्षिक सर्वसाधारण सभा खालील कामकाजासाठी मंगळवार दिनांक ८ सप्टेंबर, २०२६ रोजी सायं. ६.३० वाजता कै. सुधीर अवचट सभागृह, सचिवालय जिमखाना, मुंबई येथे होईल.

१) सचिवालय जिमखान्याच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्तांत मंजूर करणे.
२) सचिवालय जिमखान्याच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्तांत मंजूर करणे.
३) सन २०२५-२६ चा वार्षिक अहवाल व परिक्षित लेखा विवरणपत्र आणि ताळेबंद सभेपुढे सादर करणे.
४) सन २०२६-२७ करिता लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे.
५) कार्यकारी समितीवर नव्याने नियुक्त झालेल्या १५ (पंधरा) सदस्यांच्या नावाची घोषणा करणे.
६) अध्यक्षांच्या परवानगीने इतर कामकाज.

दिनांक : २४ जुलै, २०२६

सुनिल आगरकर
मानद महासचिव

**टीप :-**

| | |
|---|---|
| १ | सायंकाळी ६.३० वाजता बैठक सुरु करण्यात येईल. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास तहकूब केलेल्या वेळेपासून ३० मिनिटांनंतर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी घेण्यात येईल. अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही. |
| २ | निवडणूक प्रक्रिया (मतदान) दुपारी १२.०० ते सायं. ७.०० वाजेपर्यन्त राहील. |
| ३ | सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांना लेख्यांबाबत विशिष्ट माहिती हवी असल्यास किंवा काही सूचना द्यावयाच्या असल्यास त्यांनी जिमखाना व्यवस्थापकांकडे दिनांक १ सप्टेंबर, २०२६ पर्यन्त त्यासंबंधी लेखी निवेदन द्यावे. |
| ४ | सर्व सभासदांनी सभेला येताना सचिवालय जिमखान्याने दिलेले ओळखपत्र सोबत आणावे. |
| ५ | मतदानासाठी जिमखान्याचे सभासद/निवृत्त सभासद यांचेकडे ओळखीचा पुरावा म्हणून जिमखाना/ शासकीय ओळखपत्र / पॅन कार्ड अथवा आधारकार्ड यापैकी एक ओळखपत्र असणे आवश्यक आहे. |

**टीप :- मतदानाचा हक्क फक्त ३१ मार्च, २०२६ पूर्वी झालेल्या आजीव सभासदांनाच राहील. ज्या आजीव सभासदांची मार्च, २०२६ पर्यन्तची वर्गणी थकीत आहे, त्यांनी निवडणुकीपूर्वी संपूर्ण थकीत रक्कम भरावी, अन्यथा सदर सभासदास मतदान करता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.**

## सचिवालय जिमखाना, मुंबई

प्रिय सभासद बंधू आणि भगिनींनो,

या अहवाल वर्षात जिमखान्याचे ज्ञात/अज्ञात दिवंगत सदस्य आणि मातृभूमीच्या रक्षणासाठी सीमेवर शहीद झालेले शूर जवान या सर्वांच्या पवित्र स्मृतीस अभिवादन करुन आपल्या सचिवालय जिमखान्याच्या ७३ व्या सर्वसाधारण सभेचा वार्षिक अहवाल मी आपणासमोर सादर करीत आहे.

दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत सभासदांनी कार्यकारिणी समितीवर १५ सदस्यांची निवडणूकीव्दारे निवड करावी आणि त्यापैकी ३ जागा महिलांसाठी राखीव असाव्यात अशी मागणी केली. त्यास जिमखान्याचे पदसिध्द उपाध्यक्ष तथा मा. मुख्य सचिव श्री. राजेश कुमार यांनी सदर सुधारणा मान्य करण्याचे आश्वासित करुन जिमखान्याच्या उपविधीत तशी सुधारणा करावी अशी सूचना केली. त्यानुसार मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना विशेष सर्वसाधारण बैठकीत झालेल्या ठरावानुसार उपविधीत सुधारणा करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्यात आला. दिनांक १५ मे, २०२६ रोजी मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्याकडून सुधारीत उपविधीस मान्यता देण्यात आली आहे.

सचिवालय जिमखान्याच्या कला व क्रीडा गुणांना सतत प्रोत्साहन देऊन नवनवीन उपक्रम हाती घेऊन सचिवालय जिमखान्याचा उत्कर्ष साधण्याचे प्रामाणिक प्रयत्न करण्यात येतात.

या अहवाल वर्षात सचिवालय जिमखान्यामार्फत अखिल भारतीय नागरी सेवा खो खो स्पर्धेचे आयोजन महाराष्ट्र शासनाच्यावतीने श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे करण्यात आले होते. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या महिला व पुरुष संघाने सुवर्ण पदक मिळवून महाराष्ट्र राज्याचे नाव उज्वल केले.

**अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा व कला स्पर्धामध्ये महाराष्ट्र राज्याच्या संघानी खालीलप्रमाणे पारितोषिके प्राप्त केली आहेत. आपल्या सभासदांनी/खेळाडू/कलाकारांनी केलेली ही सर्वोच्च कामगिरी आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.**

| क्रीडा व कला विभाग | सुवर्ण | रौप्य | कांस्य | एकूण |
|---|---|---|---|---|
| ॲथलेटिक्स | १ | ७ | १ | ९ |
| संगीत व नृत्य | १ | २ | २ | ५ |
| वेटलिफ्टींग व पॉवरलिफ्टींग | ७ | १ | ३ | ११ |
| कुस्ती | २ | - | ५ | ७ |
| लॉन टेनिस | २ | - | - | २ |
| टेबल टेनिस | - | १ | २ | ३ |
| योग | १ | ७ | ७ | १५ |

सचिवालय जिमखान्याच्या सभासदांच्या कला व क्रीडा गुणांचा विकास होण्यासाठी दरवर्षी आंतर कार्यालयीन स्पर्धांचे आयोजन करण्यात येते. या वर्षीदेखील २०२५-२६ मध्ये जिमखान्यातर्फे विविध कला व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व स्पर्धांमध्ये पारितोषिक विजेते, उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या संघाचे तसेच खेळाडूंचे मी जिमखान्यातर्फे हार्दिक अभिनंदन करतो.

जिमखान्याच्या पारंपारिक व्यायामशाळेच्या सभासदांच्या मागणीनुसार व कार्यकारिणीने आश्वासित केल्यानुसार व्यायामशाळेचे नुतनीकरण करण्यात आले आहे.

मित्रहो, आपल्या जिमखान्याच्या सार्वभौम विकासासाठी व्यवस्थापकीय समिती सतत प्रयत्नशील असली तरी, आपल्या सहकार्याशिवाय हा उद्देश सफल होणे शक्य नाही. यासाठी आपण देत असलेले सहकार्य व प्रेम यापुढेही देत रहावे, ही विनंती.

**!! जय हिंद जय महाराष्ट्र !!**

सुनिल आगरकर<br>
मानद महासचिव

# सचिवालय जिमखाना, मुंबई

## सन २०२५-२६

## वार्षिक अहवाल

सचिवालय जिमखान्याची व्यवस्थापकीय समिती, सन २०२५-२६ चा वार्षिक अहवाल सहर्ष सादर करीतआहे.

**अहवालाच्या वर्षी पुढील नमुद केल्याप्रमाणे नवीन सभासद नोंदविण्यात आले :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| आजीव सभासद | - | ८२ | सर्वसाधारण सभासद | - | ३० |
| विद्यार्थी सभासद | - | ०१ | मानद सभासद (पती-पत्नी) | - | ०१ |

**जिमखान्याची एकूण सभासद संख्या आता पुढीलप्रमाणे आहे :-**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| पुरस्कर्ते/उपपुरस्कर्ते | - | १२ | | | |
| आजीव सभासद | - | ६३७० | सर्वसाधारण सभासद | - | ३२ |
| विद्यार्थी सभासद | - | ०१ | मानद सभासद (पती-पत्नी) | - | ०१ |

जिमखान्याची एकूण सभासद संख्या वर्ष अखेर ६४११ झाली आहे. (५ दिवंगत सभासद वगळता)

अहवाल वर्षी व्यवस्थापकीय समितीच्या एकूण १२ सभा झाल्या आहेत व उपस्थित सभासदांची संख्या सोबत जोडलेल्या प्रपत्र-१ मध्ये देण्यात आली आहे.

सचिवालय जिमखान्याच्या सर्व सभासदांनी दिलेल्या सहकार्याबद्दल व्यवस्थापकीय समिती मन:पूर्वक आभारी आहे. तसेच यापुढे अधिकतम सभासद जिमखान्याच्या सुविधांचा लाभ घेतील, अशी आशा समिती बाळगते.

वेगवेगळ्या क्रीडा विभागाचे मानद सचिव व मानद सहाय्यक सचिव तसेच सचिवालय जिमखान्याच्या कर्मचारी वर्गाने दिलेल्या सहकार्याबद्दल व्यवस्थापकीय समिती ऋणी आहे.

सचिवालय जिमखान्याच्या वेगवेगळ्या विभागाने केलेली कामगिरी पुढे नमूद करण्यात आली आहे.

# सचिवालय जिमखाना, मुंबई

## विशेष सर्वसाधारण सभा

**सोमवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०२५, वेळ - सायंकाळी ४.३० वाजता**

**स्थळ : बॅडमिंटन हॉल, सचिवालय जिमखाना, ६, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०००३२.**

## विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त

सचिवालय जिमखाना, मुंबईची विशेष सर्वसाधारण सभा, सोमवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी सचिवालय जिमखाना, ६, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ येथे संपन्न झाली.

सभेच्या व्यासपीठावर श्री. सतीश जोंधळे, सभापती, श्री. अरविंद शेटे - उपसभापती, श्री.सुनिल आगरकर - मानद महासचिव, श्री. सतीश सोनवाने - मानद खजिनदार, श्रीमती मंगल नाखवा- मानद सहसचिव, श्री. मकरंद गयावळ - मानद सहसचिव, श्री. संजय पोफळे – मानद सहसचिव, श्री. संजय कदम - मानद सचिव, श्रीमती अपर्णा जाधव - मानद सचिव, श्री.मारुती कवालदार - मानद सचिव, श्री. जयदीप कामत - मानद सचिव, श्री. प्रविण मुंढे - मानद सचिव, श्री. प्रताप माडकर - मानद सचिव, श्री. चेतन चव्हाण - मानद सचिव हे उपस्थित होते.

मानद महासचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व पुढे असे नमूद केले की, सचिवालय जिमखान्याच्या विशेष सर्वसाधारण सभेची सूचना दिनाक १२ सप्टेंबर, २०२५ रोजी सचिवालय जिमखान्याच्या सूचना फलकावर प्रदर्शित केली आहे तसेच ती जिमखान्याच्या www.sachivalayagymkhana.com या संकेतस्थळावरसुध्दा प्रसिध्द करण्यात आली आहे. विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचना दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी सर्व सभासदांना पोस्टाने पाठविण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर सभासदांच्या जिमखान्याकडे नोंद असलेल्या मोबाईल क्रमांकावर व्हॉट्सअॅपच्या माध्यमातून २०२४-२५ च्या अहवालाची लिंकही सभासदांना पाठविण्यात आलेली आहे. दिनांक २५ सप्टेंबर, २०२५ च्या महाराष्ट्र टाईम्स या वृत्तपत्रामध्ये विशेष सर्वसाधारण सभेच्या बैठकीची सूचना प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

मानद महासचिवांनी पुढे असे नमूद केले की, आवश्यक गणसंख्या नसल्यामुळे, सदर विशेष सर्वसाधारण सभा ३० मिनिटांसाठी तहकूब करण्यात येत आहे. पुढील सभेस गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

३० मिनिटानंतर विशेष सर्वसाधारण सभेस सुरुवात झाली.

या विशेष सर्वसाधारण सभेस २४६ सभासद उपस्थित राहिले.

सभेच्या व्यासपीठावर श्री. राजेश कुमार, मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन व पदसिध्द उपाध्यक्ष, श्री. सतीश जोंधळे, सभापती, श्री. अरविंद शेटे - उपसभापती, श्री. सुनिल आगरकर - मानद महासचिव, श्रीमती मंगल नाखवा- मानद सहसचिव, श्री. मकरंद गयावळ - मानद सहसचिव, श्री. संजय पोफळे - मानद सहसचिव, श्री. सतीश सोनवाने - मानद खजिनदार, श्री.संजय कदम - मानद सचिव, श्रीमती अपर्णा जाधव - मानद सचिव, श्री. मारुती कवालदार - मानद सचिव, श्री. जयदीप कामत - मानद सचिव, श्री. प्रविण मुंढे - मानद सचिव, श्री. प्रताप माडकर - मानद सचिव, श्री. चेतन चव्हाण - मानद सचिव हे उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीस, मा. मुख्य सचिव व पदसिध्द उपाध्यक्ष, सचिवालय जिमखाना यांचा सभापती, व्यवस्थापन समिती यांच्या हस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

"सचिवालय जिमखान्याचे पदसिध्द अध्यक्ष तथा मा. मुख्यमंत्री, हे त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे सभेस उपस्थित राहू शकले नाहीत. त्यामुळे मा. श्री. राजेश कुमार, मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन व पदसिध्द उपाध्यक्ष, सचिवालय जिमखाना यांनी सभेचे अध्यक्षपद स्वीकारावे अशी मी त्यांना विनंती करतो" अशी विनंती मानद महासचिवांनी केली.

श्री. अरविंद शेटे, उपसभापती, सचिवालय जिमखाना यांनी त्यास अनुमोदन दिले.

मा. मुख्य सचिव तथा पदसिध्द उपाध्यक्ष, सचिवालय जिमखाना यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारुन, सर्व उपस्थितांचे स्वागत केले आणि सभेस सुरुवात करण्यासाठी आवश्यक ती गणसंख्या आहे असे गृहीत धरुन सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती दिली.

सभेच्या सुरुवातीला देशातील थोर व्यक्ती, सीमेचे रक्षण करतांना शहीद झालेले जवान, तसेच पहेलगाम हल्ल्यामध्ये मृत्यूमुखी पडलेले नागरीक व अहवाल वर्षात ज्ञात व अज्ञात दिवंगत झालेल्या सचिवालय जिमखान्याच्या सभासदांना दोन मिनिटे स्तब्धता पाळून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

उपसभापती यांनी असे नमूद केले की, 'दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ रोजी सचिवालय

जिमखान्याची विशेष सर्वसाधारण सभा संपन्न झाली होती. त्यामध्ये काही निर्णय घेण्यात आले होते / सचिवालय जिमखान्याच्या उपविधीमध्ये काही सुधारणा करण्यात आल्या होत्या. त्यातील काही सुधारणा आवश्यक होत्या तर काही सुधारणांचा पुर्नविचार करणे आवश्यक आहे, असे सभासदांचे मत होते व त्यानुसार अनेक सभासदांनी लेखी स्वरुपात मागणी केली होती. या आधारे सचिवालय जिमखाना व्यवस्थापन समितीकडून जिमखान्याच्या उपविधीमध्ये सुधारणा करण्याबाबत विचार विनिमय करुन त्यावर योग्य तो निर्णय घेण्यासाठी आजच्या विशेष सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आलेले आहे."

उपसभापती यांनी पुढे असे नमूद केले की, 'ज्या उपविधीमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे, त्या नियमांची यादी सचिवालय जिमखान्याच्या फलकावर दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ रोजी लावण्यात आली होती. तसेच त्याबाबत सर्व सभासदांना अवगत करण्यात आले आहे ."

यावर श्री. युवराज अजेटराव यांनी अशी विचारणा केली की, विशेष सर्वसाधारण सभा बोलविण्यासाठी जी सूचना दिनांक १२ सप्टेंबर, २०२५ रोजी प्रसिध्द केली आहे त्यास अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांची मान्यता घेतली आहे काय? अध्यक्ष म्हणजेच मा. मुख्यमंत्री यांची मान्यता घेतल्याचे निदर्शनास आलेले नाही. अशी मान्यता घेतलेली नसल्यास सदर विशेष सर्वसाधारण सभा पुढे ढकलण्यात यावी.

त्यांनी पुढे अशी विचारणा केली की, सचिवालय जिमखान्याच्या उपविधीमध्ये ज्या काही सुधारणा करावयाच्या आहेत त्यास सचिवालय जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीने तरी मान्यता दिलेली आहे काय?

श्री. संजीव केळुसकर यांनी असे प्रतिपादन केले की, श्री. युवराज अजेटराव यांनी जो मुद्दा उपस्थित केला आहे तो तांत्रिक स्वरुपाचा आहे. गेल्या वर्षी जी विशेष सर्वसाधारणा सभा दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ रोजी घेण्यात आली होती, त्यालासुध्दा अध्यक्षांची अनुमती घेण्यात आलेली नव्हती. सचिवालय जिमखान्याच्या काही सभासदांनी जिमखान्यामध्ये सुधारणा होण्यासाठी प्रस्तावाऐवजी निवेदने सादर केली होती, त्याच आधारावर तत्कालीन उपाध्यक्ष, सचिवालय जिमखाना यांनी त्यांच्या स्वाक्षरीने सूचना निर्गमित करून विशेष सर्वसाधारण सभा आयोजित केली होती. त्याससुध्दा त्या वेळच्या व्यवस्थापकीय समितीने मान्यता दिलेली आहे किंवा नाही हा प्रश्न कोणीही उपस्थित केला नव्हता. त्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये असेही ठरले होते की, जी काही निवेदने प्राप्त झाली आहेत त्याचा अभ्यास करण्यासाठी एक उपसमिती गठीत

करुन निर्णय घेण्यात येईल. तथापि, अशी उपसमिती गठीत करण्यात आली होती किंवा नाही याची माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे, तांत्रिक बाबींचा उहापोह न करता, प्रस्तावित सुधारणांवर चर्चा करावी.

उपसभापती यांनी असे स्पष्ट केले की, विशेष सर्वसाधारण सभा बोलाविण्यासाठी अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांची पूर्व परवानगी घेणे अपेक्षित नाही. तथापि, त्यांना सभेस उपस्थित राहण्यासाठी रितसर स्वतंत्रपणे निमंत्रण देण्यात येते आणि त्यानुसारच आज सचिवालय जिमखान्याचे पदसिध्द उपाध्यक्ष विशेष सर्वसाधारण सभेस उपस्थित आहेत. जिमखान्याच्या नियमावलीतील नियम २९ (a) मध्ये स्पष्ट म्हटले आहे की, The Special General Meeting may be convened at any time by the Managing Committee. त्याच आधारे व्यवस्थापकीय समितीने आजची विशेष सर्वसाधारण सभा आयोजित केली आहे.

तसेच सभेचे अध्यक्ष कोण असावेत याचाही उल्लेख, सचिवालय जिमखाना नियमावलीतील नियम ३२ मध्ये करण्यात आला आहे तो पुढीलप्रमाणे आहे. “At all Annual / Special General Meetings, the Ex. Officio President and in his absence Ex. Officio Vice President and in the absence of Ex. Officio Vice President, the Chairman of the Managing Committee and in the absence of the Chairman, the Vice Chairman of the Managing Committee shall preside over the meeting. In the absence of Ex-Officio President, Ex-Officio Vice-President and the Chairman and the Vice-Chairman of the Managing Committee, the members present may elect from among themselves a Chairman for the meeting.”

यानंतर विशेष सर्वसाधारण सभेच्या प्रस्तावित सुधारणाच्या कामकाजास सुरुवात झाली.

प्रस्तावित सुधारणा :- नियम क्रमांक ४

- आजीव सभासदत्वासाठी किमान सेवेची अट **१ वर्ष** ठेवण्यात यावी.
- बृहन्मुंबई बाहेर बदलीपात्र सेवा असलेल्या व खेळात प्राविण्य मिळविलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांप्रमाणेच कला / सांस्कृतिक क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांनाही आजीव सभासदत्वासाठी पात्र ठरविण्यात यावे. नियम क्रमांक ४ मधील उपविधीमध्ये सुधारणा करण्याच्या प्रस्तावावर श्री. युवराज अजेटराव व श्री. प्रशांत साजणीकर यांनी असे प्रतिपादन केले की, मागील वर्षी म्हणजेच दिनांक ३० ऑगस्ट, २०२४ च्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये नियम क्रमांक ४ मध्ये अशी

सुधारणा केली होती की, आजीव सभासदत्वासाठी किमान २ वर्ष सेवेची अट ठेवण्यात यावी. त्याचे कारण असे होते की, अधिकारी किंवा कर्मचारी नोकरीला लागल्यानंतर त्याचा परिविक्षाधीन कालावधी (Probation Period) हा दोन वर्षाचा असतो. सदर परिविक्षाधीन कालावधी संपल्यानंतर तो शासकीय सेवेत कायम होतो म्हणून ही दोन वर्षाची अट ठेवण्यात आली होती.

उपसभापती यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, नियम क्रमांक ४ मधील मागील सभेमध्ये "बृहन्मुंबई बाहेर बदलीपात्र सेवा असलेल्या व खेळात प्राविण्य मिळविलेल्याच अधिकारी / कर्मचाऱ्यांना आजीव सभासदत्वासाठी पात्र ठरविण्यात यावे" यामध्ये आता जी सुधारणा प्रस्तावित केली आहे ती म्हणजेच "बृहन्मुंबई बाहेर बदलीपात्र सेवा असलेल्या व खेळात प्राविण्य मिळविलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांप्रमाणेच कला / सांस्कृतिक क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनाही आजीव सभासदत्वासाठी पात्र ठरविण्यात यावे" या प्रस्तावित सुधारणेस त्यांनी अनुमती दर्शविली.

उपसभापती यांनी पुढे असे ही स्पष्ट केले की, परिविक्षाधीन कालावधी (Probation Period) हा फक्त अधिकारी वर्गासाठी असतो, गट क आणि ड वर्गासाठी नाही. त्याचप्रमाणे अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत सहभागी होण्यासाठी फक्त ६ महिने सेवा झालेली असेल अशा अधिकारी / कर्मचाऱ्यांस पात्र ठरविण्यात आलेले आहे. त्यामुळे आजीव सभादत्वासाठी किमान सेवेची अट १ वर्ष ठेवण्यात आली आहे त्या प्रस्तावित सुधारणेस सर्वांनी अनुमती द्यावी.

उपरोक्त प्रस्तावित सुधारणेस मान्यता देण्याचा प्रस्ताव श्री. संजीव केळुसकर यांनी मांडला तर त्यास श्री. गजानन सावंत यांनी अनुमोदन दिले.

नियम क्रमांक ४ आजीव सभासदत्वासाठी किमान २ वर्ष सेवेची अट ठेवण्यात आली आहे त्याऐवजी "आजीव सभासदत्वासाठी किमान सेवेची अट १ वर्ष ठेवण्यात यावी" तसेच बदलीपात्र सेवा असलेल्या व खेळात प्राविण्य मिळविलेल्याच अधिकारी/कर्मचाऱ्यांना आजीव सभादत्वासाठी पात्र ठरविण्यात यावे, या ऐवजी "बृहन्मुंबई क्षेत्राबाहेर बदलीपात्र सेवा असलेल्या व खेळात प्राविण्य मिळविलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांप्रमाणेच कला /सांस्कृतिक क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनाही आजीव सभासदत्वासाठी पात्र ठरविण्यात यावे" या सुधारणेस सर्वानुमते सहमती दर्शविण्यात आली.

उपसभापती यांनी नियम क्रमांक १९ (अ) मध्ये मागील विशेष सर्वसाधारण सभेत केलेली सूचना "व्यवस्थापकीय समितीवर १५ सदस्य असावेत. यातील १२ सदस्यांची नियुक्ती निवडणूकीद्वारे करण्यात

यावी. त्यापैकी महिलांसाठी २ जागा, राष्ट्रीय / आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी २ जागा राखीव असाव्यात, आणि ३ सदस्य स्वीकृत असतील" अशी जी सुधारणा केली आहे त्या ऐवजी "व्यवस्थापकीय समितीवरील सर्व १५ सदस्यांची नियुक्ती निवडणूकीद्वारे करण्यात यावी. तसेच सर्व घटकांना पुरेसे प्रतिनिधत्व नैसर्गिकरित्याच मिळत असल्याने कोणतेही आरक्षण नसावे" अशी सुधारणा प्रस्तावित केली.

श्री. संजय इंगळे यांनी असे प्रतिपादन केले की, स्वीकृत सदस्य हे विशेष प्राविण्य मिळविलेले असतात, त्यामुळे त्यांच्या प्राविण्याचा जिमखान्यास लाभ होतो. पूर्वीसुध्दा जिमखाना व्यवस्थापकीय समितीमध्ये तीन स्वीकृत सदस्य घेण्यात येत होते, त्यावेळेस त्यास कोणीही आक्षेप घेतला नाही. तथापि आताच स्वीकृत सदस्य नसावेत असा निर्णय घेण्याचे कारण काय ? त्यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, सचिवालय जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीवर दोन महिला सदस्य निवडून येत आहेत. तथापि, हीच स्थिती कायम राहणार नाही. त्यामुळे, महिलांसाठी आरक्षण असावे.

श्री. सु.सा.गायकवाड यांनी अशी सूचना केली की, सर्व १५ सदस्यांची नियुक्ती निवडणूकीद्वारे करण्यात यावी, ही जी सूचना केली आहे ती व्यवहार्य आहे. त्यामुळे प्रस्तावित सुधारणा स्वीकारण्यात यावी.

श्रीमती ललिता रेंगडे यांनी अशी सूचना केली की, सर्व ठिकाणी किंवा सर्व आस्थापनांवर महिलांसाठी आरक्षण ठेवण्यात आले आहे, त्यामुळे सचिवालय जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीवर महिलांसाठी आरक्षण असावे.

श्री. संजीव केळुसकर यांनी असे निदर्शनास आणून दिले की, आतापर्यंतच्या व्यवस्थापकीय समितीवर निवडून आलेल्या सदस्यांमध्ये ८० टक्के सदस्य हे राष्ट्रीय पातळीवर (अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा ) खेळलेले खेळाडू आहेत. अनेक वर्षांपासून सचिवालय जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीवर दोन महिला सदस्य म्हणून निवडून येत आहेत आणि त्या सक्षमपणे कार्यरत आहेत. त्यामुळे, महिलांसाठी आरक्षण ठेवण्याची आवश्यकता नाही. तसेच ज्यांना सचिवालय जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीवर काम करण्याची इच्छा आहे त्यांनी मागील दाराने म्हणजेच स्वीकृत सदस्य म्हणून प्रवेश न करता निवडणूक लढवावी आणि व्यवस्थापकीय समितीमध्ये यावे. तत्कालीन उपाध्यक्ष यांनी स्वीकृत सदस्यांची नियुक्ती करताना खेळाडूंना प्राधान्य दिल्याचे दिसत नाही. एका महिला सदस्यांस स्वीकृत सदस्य म्हणून व्यवस्थापकीय समितीवर घेण्यात आलेले आहे, त्यासुध्दा आजच्या विशेष वार्षिक सभेस अनुपस्थित आहेत.

श्री. प्रशांत साजणीकर यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सचिवालय जिमखान्याच्या

स्थापनेपासून म्हणजेच जवळपास ७० वर्षापासून सचिवालय जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीवर १२ सदस्य निवडणूकीद्वारे तर ०३ सदस्य हे स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्त करण्यात येत होते. तथापि, ३ स्वीकृत सदस्य निवडीचे अधिकार व्यवस्थापकीय समितीकडून काढून घेण्यात आले म्हणून स्वीकृत सदस्यांची संकल्पनाच रद्द करणे योग्य नाही.

सभापती यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, श्रीमती वैशाली सुळे यांची तत्कालीन उपाध्यक्ष यांनी सचिवालय जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीवर स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती करताना महिलांना पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून नियुक्ती केली आहे. त्याचप्रमाणे दुसरे स्वीकृत सदस्य श्री. चेतन चव्हाण यांचा क्रीडा विभागातील अनुभव दीर्घ आहे, तसेच सभापती श्री. सतीश जोंधळे, यांनी क्रीडा विभागात सर्वाधिक ६ वर्षे केलेली सेवा, क्रीडा व युवा धोरण आखणीतील अनुभव तसेच सामान्य प्रशासन विभागात स्नेहसंमेलन आयोजित करण्याचा त्यांना भरपूर अनुभव आहे. त्यामुळे, या तीनही सदस्यांच्या अनुभवाचा जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीस उपयोग होईल म्हणून तत्कालीन उपाध्यक्ष यांनी या तिनही सभासदांची व्यवस्थापकीय समितीवर स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती केली होती.

स्वीकृत महिला सदस्य श्रीमती वैशाली सुळे या त्यांच्या तातडीच्या कार्यालयीन कामामुळे आजच्या सभेस उपस्थित राहू शकल्या नाहीत असेही सभापतींनी स्पष्ट केले.

श्री. अनंत सावंत यांनी असे नमूद केले की, जे व्यवस्थापकीय समिती सदस्य विशेष सर्वसाधारण सभेस किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित राहणार आहेत, त्याची माहिती व्यवस्थापकीय समितीने सभेस आगाऊ द्यावयास पाहिजे.

श्री. शरद फाटक यांनी अशी विचारणा केली की, खेळाडू आरक्षित जागेवर ज्यांना नोकरी मिळाली आहे, त्यांची माहिती जिमखान्याने घ्यावी व त्यांना अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी प्रोत्साहित करावे.

श्रीमती ललिता रेंगडे यांनी असे प्रतिपादन केले की, फक्त स्वीकृत सदस्यांनीच त्यांचे म्हणणे ऐकूण घेतले आणि त्यांना मदत केली. निवडून आलेल्या कोणत्याही सदस्यांनी त्यांचे म्हणणे ऐकूण घेण्याची तसदी घेतली नाही.

श्री. अंबादास चंदनशिवे यांनी असे सूचविले की, व्यवस्थापकीय समितीवर १५ सदस्यांची निवडणूकीव्दारे नियुक्ती करण्याचा निर्णय घेण्यात यावा.

श्री. नितीन चांदोरकर यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, तत्कालीन उपाध्यक्ष यांनी ३ स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली आहे. त्यात राष्ट्रीय स्तरावर पदके प्राप्त केली आहेत, अशा खेळाडूंना स्वीकृत सदस्य म्हणून नियुक्ती मिळाली पाहिजे होती.

श्रीमती भारती कोरगावकर यांनी असे सुचविले की, महिलांसाठी २ ऐवजी ३ जागा राखीव ठेवण्यात याव्यात. त्यापैकी काही जागा क्षेत्रिय कार्यालयात कार्यरत खेळाडूंसाठी राखीव असाव्यात.

श्री. प्रविण मुंढे, मानद सचिव यांनी असे स्पष्ट केले की, सध्याच्या व्यवस्थापकीय समितीवर निवडून आलेले ९ समिती सदस्य हे राष्ट्रीय स्तरावर राज्याचे प्रतिनिधीत्व केलेले आहेत. त्याचप्रमाणे काही सदस्य हे अनुसूचित जाती-जमातीमधील आहेत. सध्याच्या व्यवस्थापकीय समितीवर सतत दोन महिला चांगल्या मताने निवडून येत आहेत. त्यामुळे कोणासही आरक्षण ठेवणे योग्य होणार नाही.

मा. मुख्य सचिव तथा उपाध्यक्ष यांनी वरील चर्चेवर असे मत व्यक्त केले की,

१) सभेसाठी उपस्थित असलेले सर्वजण खेळाडू आहेत.

२) सर्वांनी लोकशाहीवर विश्वास ठेवावयास हवा, त्यामध्ये भेदभाव नसावा.

३) तत्कालीन उपाध्यक्ष यांनी जर काही निर्णय घेतले असतील तसेच काही निर्णय या सभेच्या अध्यक्षांना त्यांच्या अधिकारात घ्यावयाचे असतील तर ते फारच अडचणीचे होईल. असे झाल्यास निवडून आलेल्या व्यवस्थापकीय समितीस काहीच अर्थ राहणार नाही. त्यामुळे सचिवालय जिमखान्याच्या कामकाजात अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष यांना वैयक्तिकरित्या निर्णय घेण्याचा अधिकार नसावा, असे आपले वैयक्तिक मत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

४) मागील विशेष सर्वसाधारण सभेमध्ये निर्णय घेताना योग्य कार्यपध्दती पाळली गेल्याचे दिसून येत नाही, त्यामुळे त्या सभेतील सर्व निर्णय रद्द करण्यात यावेत. परंतु त्यात काही चांगल्या सुधारणा असतील, तर त्याचा सर्वांनी विचार करुन योग्य त्या सुधारणांचा समावेश करावा.

५) सचिवालय जिमखाना ही मा.धर्मादाय आयुक्त यांच्याकडे नोंदणीकृत संस्था आहे. राज्यातील इतर संस्था सचिवालय जिमखान्याच्या कामकाजाकडे लक्ष ठेऊन असतात, त्या जिमखान्याकडे आदर्श संस्था म्हणून पहात असतात. त्यामुळे सचिवालय जिमखान्यात चुकीचे काही घडू नये. जे काही निर्णय घ्यावयाचे आहेत ते आदर्श असावेत, लोकशाहीच्या विरोधात नसावेत. सचिवालय जिमखान्यातील १५ व्यवस्थापकीय समिती सदस्यांची नियुक्ती ही निवडणूकीद्वारेच करण्यात

यावी. त्यामध्ये ३ जागा या महिलांसाठी राखीव असाव्यात. स्वीकृत सदस्यांची तरतूद रद्द करण्यात यावी.

६) सर्व सभासदांना सचिवालय जिमखान्याबद्दल आस्था असावी, त्यांच्यामध्ये गाढ स्नेहसंबंध असावेत. व्यवस्थापकीय समिती सदस्य, सभासद, खेळाडू व कलाकार यांच्यामध्ये वादविवाद नसावा, असल्यास त्याचे प्रदर्शन न करता ते चर्चेव्दारे सोडविण्यात यावेत.

७) सचिवालय जिमखान्यामध्ये जी काही प्रगती करावयाची आहे, जिमखान्यामध्ये अधिकच्या सोई सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या आहेत त्यासाठी जी काही मदत अध्यक्ष व उपाध्यक्ष यांच्याकडून अपेक्षित आहे ती आम्ही करण्यास कटीबध्द आहोत.

८) नियम क्रमांक २१ (C) (a) अन्वये मागील विशेष सर्वसाधारण सभेत जो निर्णय घेतला होता त्यानुसार विसर्जित होणारी व्यवस्थापकीय समिती पुन्हा निवडणूक लढविण्यासाठी पात्र असेल मात्र ज्या सभासदांचा व्यवस्थापकीय समितीमध्ये दोन टर्म (६ वर्षे) पेक्षा जास्त कालावधी झाला असेल त्यांना निवडणूक लढविता येणार नाही. असे असले तरी, लोक प्रतिनिधी हे वर्षानुवर्षे निवडणूक लढत असतात, त्यांना कोणतेही बंधन नाही. त्यामुळे हा निर्णय लोकशाहीस धरुन नसल्याने तो रद्द करण्यात यावा. बहुतेक संस्थेमध्ये अशी तरतूद दिसून येत नाही.

९) सचिवालय जिमखान्याची नियमावली ही आदर्श असावी, त्याप्रमाणेच त्यात सुधारणा कराव्यात. सचिवालय जिमखान्याच्या अडचणी सामोपचाराने सोडवाव्यात.

श्री. अंबादास चंदनशिवे यांनी, असा पुनरुच्चार केला की, सभेचे अध्यक्ष तथा पदसिध्द उपाध्यक्ष यांनी त्यांचा निर्णय दिलेला आहे. त्यास श्री. तुषार हिर्लेकर यांनी अनुमोदन दिले.

यानंतर मा. मुख्य सचिव तथा पदसिध्द उपाध्यक्ष यांचे तातडीच्या कामास्तव सभेतून प्रस्थान झाले.

उपरोक्त सर्व चर्चेस अनुसरुन, खालील प्रस्ताव व सूचना सभेसमोर सादर करण्यात आल्या.

१) आजीव सभासदत्वासाठी किमान सेवेची अट १ वर्ष ठेवण्यात यावी. बृहन्मुंबई बाहेर बदलीपात्र सेवा असलेल्या तथापि खेळात प्राविण्य मिळविलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांप्रमाणेच कला / सांस्कृतिक क्षेत्रात प्राविण्य मिळविलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांनाही आजीव सभासदत्वासाठी पात्र ठरविण्यात यावे.

२) व्यवस्थापकीय समितीवरील सर्व १५ सदस्यांची नियुक्ती निवडणूकीद्वारे करण्यात यावी. त्यातील ३ जागा महिलांसाठी आरक्षित असाव्यात.

३) नियम २१(क)(अ) नुसार विसर्जित होणारी व्यवस्थापकीय समिती पुन्हा निवडणूक लढविण्यासाठी पात्र असेल मात्र ज्या आजीव सभासदांना व्यवस्थापकीय समितीमध्ये दोन टर्म (६ वर्ष) पेक्षा जास्त कालावधी झाला असेल त्यांना निवडणूक लढविता येणार नाही ही तरतूद वगळण्यात यावी.

नियम २१ (ड) मधील व्यवस्थापकीय समितीवरील सदस्यांची मुदत ३ वर्ष राहील ही तरतूद कायम ठेवण्यात यावी मात्र नियम क्रमांक १९(अ) मधील बदलांच्या अनुषंगाने यातील स्वीकृत सदस्यांबाबतची तरतूद वगळण्यात यावी.

| EXISTING PROVISIONS | PROPOSED AMENDMENTS |
|---|---|
| **4. LIFE-MEMBERS:**<br>Any person appointed on regular basis in the civil services of the Government of Maharashtra, who has completed minimum **two** years of continuous service and whose services are not transferable out of Brihanmumbai, may be enrolled as a Life Member of the Gymkhana, on payment of Life Membership fee, as decided by the Managing Committee, from time to time.<br><br>**Provided that, any** person appointed on regular basis in the civil services of the Government of Maharashtra, **and whose services are transferable out of Brihanmumbai, desires to be a life member may be considered and enrolled by the Management Committee as life member, if he/she is excelled in sports event/s and has participated at State/ National/International level or AICS events.** | **4. LIFE-MEMBERS:**<br>Any person appointed on regular basis in the civil services of the Government of Maharashtra, who has completed minimum **one** year of continuous service and whose services are not transferable out of Brihanmumbai, may be enrolled as a Life Member of the Gymkhana, on payment of Life Membership fee, as decided by the Managing Committee, from time to time.<br><br>**Provided that, any** person appointed on regular basis in the civil services of the Government of Maharashtra, **and whose services are transferable out of Brihanmumbai, desires to be a life member may be considered and enrolled by the Management Committee as life member, if he/she is excelled in sports /cultural event/s and has participated at State/ National/ International level or AICS events.** |

| EXISTING PROVISIONS | PROPOSED AMENDMENTS |
|---|---|
| **19. MANAGING COMMITTEE & ITS CONSTITUTIONS:**<br>a) Composition of the Managing Committee:-<br>The Managing Committee shall consist of maximum 15 members, out of which 12 shall be elected members and 3 members shall be co-opted as provided under rule 21 (A). | **19. MANAGING COMMITTEE & ITS CONSTITUTIONS:**<br>a) Composition of the Managing Committee:-<br>The Managing Committee shall consist of maximum 15 members. |
| **Provided that out of 12 elected members;**<br>**(i) Two seats shall be reserved for women members and;** | **Provided that out of 15 elected members;**<br>**(I) Three seats shall be reserved for women members, However any women candidate can not contest in 2 categories (viz reserved and open) category at a time.** |
| **(ii) Two seats shall be reserved for the sportsman who has participated at International or National level or who has participated in All India Civil Services Sports event.** | **(ii) to be deleted** |
| **(iii) 8 (Eight) seats shall be reserved for General Category. ("General means open to all) Provided that if the same candidate elected from more than one category mentioned in (i) (ii) & (iii), he / she has right to keep only one seat, and resign from other seat with in 15 days of announcement of the results. Such vacant seat should be filled from the second highest vote seeker in the said category.** | **(iii) to be deleted** |
| **21.CHAIRMAN OF THE MANAGING COMMITTEE :**<br>**A) NOMINATION FOR CO-OPTION TO THE** | **21.CHAIRMAN OF THE MANAGING COMMITTEE :**<br>A) After conclusion of election for Management |

| EXISTING PROVISIONS | PROPOSED AMENDMENTS |
|---|---|
| **MANAGING COMMITTEE:**<br>After conclusion of election for Management Committee, the **Hon. Ex-Officio Vice-President, on his own discretion, shall nominate three life members preferably related with sports and who are otherwise eligible to be the members of the Managing Committee, as Co-opt Members. Such nominated members shall hold office till the term of Managing Committee in which they are co-opted.**<br>**Provided that, such co-opt member if retires/ resigns/dismissed from service during his tenure shall discontinue as such member of the Managing Committee. In such eventuality, such vacancy shall be filled in, in the like manner for the remainder of the tenure, by the Ex-Officio Vice President.** | Committee, senior most member amongs elected member shall preside over the first meeting. |
| **B) ELECT CHAIRMAN, VICE-CHAIRMAN, OFFICE BEARERS.**<br>The Managing Committee shall every year at its first meeting immediately after the Annual General Meeting, select from amongst themselves,<br>a) Chairman<br>b) Vice-Chairman and<br>c) The following office bearers:<br>i) One Hon. General Secretary;<br>ii) Three Hon. Joint Secretaries;<br>iii) One Hon. Treasurer.<br><br>These Office Bearers will be selected from amongst the elected **and/or nominated as co-opt** members. | **B) ELECT CHAIRMAN, VICE-CHAIRMAN, OFFICE BEARERS.**<br>The Managing Committee after the election of the Managing Committee or at its first meeting after the Annual General Meeting, every year, shall select from amongst themselves :-<br>a) Chairman<br>b) Vice-Chairman and<br>c) The following office bearers:<br>i) One Hon. General Secretary;<br>ii) Three Hon. Joint Secretaries;<br>iii) One Hon. Treasurer |

| EXISTING PROVISIONS | PROPOSED AMENDMENTS |
|---|---|
| **C) RETIREMENT OF THE MEMBERS OF THE MANAGING COMMITTEE:-**<br>a) The Managing Committee shall be dissolved after every three years and election shall be conducted for the new Managing Committee. The incumbent Managing Committee will continue to hold charge until a new Managing Committee is formed.<br>**The members of the dissolving Managing Committee shall be eligible for re-election.**<br>**Provided that no life member shall be a member of the Managing Committee for more than 2 terms (6 years) throught his membership.**<br>**Further also provided that, life member shall not be eligible to contest election after attaining age of superannuation or has been retired voluntarily or resigned from services or terminated / dismissed from the service.** | **C) RETIREMENT OF THE MEMBERS OF THE MANAGING COMMITTEE:-**<br>a) The Managing Committee shall be dissolved after every three years and election shall be conducted for the new Managing Committee, The incumbent Managing Committee will continue to hold charge until a new Managing Committee is formed.<br>Members of the dissolving Managing Committee shall be eligible for re-election.<br>**Provided that, life member shall not be eligible to contest election if he/ she has only two years for attaining age of superannuation or has been retired voluntarily or resigned from services or terminated/dismissed from the service.** |
| b) Any vacancy arising due to death, resignation, and demission of office or otherwise, in any year shall be filled by co- option which shall be co-terminable with the remaining tenure of the Member who has expired, resigned or demitted office.<br>**Provided that, such co-option shall be in consonance with provision in rule no 21 (C)(a).** | b) Any vacancy arising due to death, resignation, and demission of office or otherwise, shall be filled in by election the number of such vacancies exceeds two (2) and remaining term is more than two (2) years. |
| **D) TENURE OF THE MEMBERS OF THE MANAGING COMMITTEE:-**<br>The tenure of the Members of the Managing Committee shall be for a period of three years.<br>**The tenure of the co-opted members shall be** | **D) TENURE OF THE MEMBERS OF THE MANAGING COMMITTEE:-**<br>The tenure of the Members of the Managing Committee shall be for a period of three years. |

| EXISTING PROVISIONS | PROPOSED AMENDMENTS |
|---|---|
| **till the completion of tenure of the Managing Committee.** | |
| **28. A) ANNUAL GENERAL MEETING:**<br>c) At least fourteen days written notice shall be given in writing to the Life members before holding the Annual General Meeting or Special General Meeting, and non-receipt of any notice by any member shall not invalidate a meeting, so long as such notice is served by the Gymkhana either personally or **by email/SMS/Whatsapp or any other electronic media** post addressed to their latest registered address or on email or the mobile number recorded with the Gymkhana, as the case may be.<br>**However, powers to relax prescribed minimum period shall vest with the Ex-Officio Vice-President.** | **28. A) ANNUAL GENERAL MEETING:**<br>c) At least fourteen days written notice shall be given in writing to the Life members before holding the Annual General Meeting or Special General Meeting, and non-receipt of any notice by any member shall not invalidate a meeting, so long as such notice is served by the Gymkhana either personally or **by email/SMS/Whatsapp or any other electronic media** post addressed to their latest registered address or on email or the mobile number recorded with the Gymkhana, as the case may be. |
| **30. NOTICE OF ANNUAL / SPECIAL GENERAL MEETING:**<br>At least fourteen days written notice shall be given in writing to the Life members before holding the Annual General Meeting or Special General Meeting, and non-receipt of any notice by any member shall not invalidate a meeting, so long as such notice is served by the Gymkhana either personally or **by email/SMS/Whatsapp or any other electronic media** post addressed to their latest registered address or on email or the mobile number recorded with the Gymkhana, as the case may be.<br>**However, powers to waive of prescribed minimum period shall vest with the Ex-Officio Vice-President.** | **30. NOTICE OF ANNUAL / SPECIAL GENERAL MEETING:**<br>At least fourteen days written notice shall be given in writing to the Life members before holding the Annual General Meeting or Special General Meeting, and non-receipt of any notice by any member shall not invalidate a meeting, so long as such notice is served by the Gymkhana either personally or **by email/SMS/Whatsapp or any other electronic media** post addressed to their latest registered address or on email or the mobile number recorded with the Gymkhana, as the case may be. |

या प्रस्तावित सुधारणा स्वीकारण्यात याव्यात/त्यास मंजूरी देण्यात यावी. मागील विशेष सर्वसाधारण सभेमध्ये केलेल्या उर्वरित सुधारणा रद्द करण्यात याव्यात, त्यास श्रीमती भारती कोरगांवकर, श्री. शिरीष मोहोड, श्री. सुनिल विल्यम्स यांनी अनुमोदन दिले.

वरील प्रस्ताव सर्वानुमते संमत करण्यात आले.

श्री. संजय इंगळे यांनी अशी सूचना केली की, सचिवालय जिमखान्याने १५ दिवसांची विशेष मोहिम राबवून नवीन आजीव सभासद करुन घ्यावेत आणि निवडणूकीपूर्वी त्यांना सचिवालय जिमखान्यातील निवडणूकीचा मतदानाचा हक्क द्यावा.

श्री. तुषार हिर्लेकर व श्री. अनंत सावंत यांनी याबाबत असे नमूद केले की, श्री. संजय इंगळे यांनी केलेली सूचना ही आजच्या बैठकीच्या विषय सुचीवर नाही, हा विषय ते वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित करु शकतात.

श्री. प्रविण मुंढे, मानद सचिव यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, दर वर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेची तारीख ठरलेली नसते, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या आधी १५ दिवस सभेची सूचना काढण्यात येते, आणि त्याच्या १५ दिवस अगोदर जे नव्याने आजीव सभासद होतील त्यांना मतदानाचा हक्क देणे थोडेसे अडचणीचे होईल. सध्या मागील आर्थिक वर्षाचे दिनांक ३१ मार्च या दिवशी जे आजीव सभासद आहेत त्यांना सचिवालय जिमखान्याच्या निवडणूकीत मतदान करण्याचा अधिकार आहे, त्याप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

श्री. प्रशांत साजणीकर यांनी अशी सूचना केली की, नियम क्रमांक ३० अन्वये विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचनेसाठी (नोटीस) आवश्यक असलेला किमान कालावधी कमी करण्याचे अधिकार सचिवालय जिमखान्याच्या पदसिध्द उपाध्यक्ष यांना असावेत.

श्री. प्रमोद पंडीत, श्री. विजय चव्हाण यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सभेचे अध्यक्ष - मुख्य सचिव तथा उपाध्यक्ष यांनी वर उल्लेखिलेल्या काही सुधारणा स्वीकाराव्यात तर मागील बैठकीत घेतलेल्या उर्वरित सुधारणा रद्द करण्यात याव्यात असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे नियम क्रमांक ३० मधील सुधारणा रद्द समजण्यात याव्यात. त्यावर पुन्हा चर्चा करु नये.

नियम क्रमांक ३० मध्ये मागील बैठकीत केलेली सुधारणा वगळण्यात यावी या प्रस्तावास श्री. सुनिलकुमार धोंडे यांनी अनुमोदन दिले.

वरील चर्चेनंतर नियम क्रमांक ३० विशेष सर्वसाधारण सभेच्या सूचनेसाठी आवश्यक असलेला किमान कालावधी कमी करण्याचे अधिकार सचिवालय जिमखान्याच्या उपाध्यक्षांना राहतील ही मागील विशेष सर्वसाधारण सभेत केलेली सुधारणा वगळण्यात यावी यास सर्वानुमते पुनःश्च मंजूरी देण्यात आली.

श्री. अनंत सावंत यांनी असे निदर्शनास आणून दिले की, महिलांच्या राखीव जागेवर कोणत्याही महिला खेळाडूने अर्ज केला नाही तर सदर जागा रिकाम्या राहतील किंवा त्यावर इतर काही पर्याय असतील त्याचा जिमखान्याच्या उपविधीमध्ये समावेश करावा लागेल.

श्री. युवराज अजेटराव यांनीही महिला सभासद या फक्त त्यांच्यासाठी राखीव जागेवर किंवा खुल्या प्रवर्गातील जागा यापैकी एक निवडणूक लढवू शकतील, एकाच वेळेस दोन्ही प्रवर्गातून संचालक पदासाठी निवडणूक लढवू शकणार नाहीत अशी सुस्पष्ट तरतूद असावी, या निर्णयाचा पुनरुच्चारही केला.

श्री. प्रविण मुंढे, मानद सचिव यांनी असे नमूद केले की, सप्टेंबर, २०२५ अखेर सध्याच्या व्यवस्थापकीय समितीची मुदत संपत आहे. सचिवालय जिमखान्याच्या उपविधीमधील तरतूदीनुसार, नवीन व्यवस्थापकीय समिती स्थापन होईपर्यंत कार्यरत व्यवस्थापकीय समिती कार्यभार सांभाळेल. तथापि आता सुचविलेल्या सूचना/ सुधारणा लवकरात लवकर मा.धर्मादाय आयुक्तांना मान्यतेसाठी सादर करून सुधारीत नियमावलीच्या अनुषंगाने निवडणूक घेण्याची तयारी करता येईल.

श्री. अरविंद शेटे, उपसभापती यांनी असे प्रतिपादन केले की, आताच्या विशेष सर्वसाधारण सभेत ज्या काही सुधारणा सुचविण्यात आलेल्या होत्या, त्यापैकी काही प्रस्तावित सुधारणांवर चर्चा झाली आणि त्यावर निर्णयसुध्दा झाला. तथापि, उर्वरित अनुषंगिक प्रस्तावित सुधारणांवर चर्चा झाली नाही. अशा अनुषंगिक प्रस्तावित सुधारणा व उपविधीतील परिशिष्ट १ मधील संबंधित सुधारणा आपणा सर्वांस मान्य आहेत, असे गृहित धरण्यात यावे. तसेच, आताच्या विशेष साधारण सभेमध्ये ज्या काही सुधारणा मंजूर करण्यात आलेल्या आहेत त्याची वैधता तपासून, त्याप्रमाणे त्या सचिवालय जिमखान्याच्या नियमावलीत समावेश करुन त्याची अंमलबजावणी करावी लागेल. जर या कार्यवाहीस विलंब होणार असल्यास, आता ज्या काही सुधारणा करावयाच्या आहेत त्या मा.धर्मादाय आयुक्त यांना कळवून त्याप्रमाणे नवीन व्यवस्थापकीय समितीच्या निवडणूकीची पुढील कार्यवाही करता येऊ शकेल काय हे तपासून पाहिले जाईल आणि त्याप्रमाणे पुढील कार्यवाही सुरु करण्यात येईल.

जिमखान्याची व्यवस्थापकीय समिती, सर्व सभासद, जिमखान्याचे कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच नवीन येणाऱ्या व्यवस्थापकीय समितीससुध्दा असेच चांगले सहकार्य करण्याची विनंती केली.

श्री. सतीश जोंधळे, सभापती यांनी वरील चर्चेनंतर समारोप करताना असे प्रतिपादन केले की, उपविधीमध्ये ज्या काही सुधारणा सुचविलेल्या आहेत /केलेल्या आहेत त्यास प्रथमत: मा.धर्मादाय आयुक्त यांची मान्यता घ्यावी लागेल. त्यांनी पुढे असे नमूद केले की, मुख्य सचिव तथा पदसिध्द उपाध्यक्ष, सचिवालय जिमखान्याची व्यवस्थापकीय समिती, जिमखान्याचे सर्व सभासद यांनी केलेली मदत, सहकार्य, मार्गदर्शन इत्यादींबद्दल ते सर्वांचे ऋणी आहेत.

श्री. सतीश जोंधळे, सभापती यांनी सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानले आणि विशेष सर्वसाधारण सभेची सांगता झाल्याचे जाहीर केले.

( सुनिल आगरकर ) — ( सतीश जोंधळे )

मानद महासचिव — सभापती

( राजेश कुमार )

मा. मुख्य सचिव तथा उपाध्यक्ष,

सचिवालय जिमखाना, मुंबई

# सचिवालय जिमखाना, मुंबई

## ७२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

**सोमवार, दिनांक २९ सप्टेंबर, २०२५, सायंकाळी ६.३० वाजता**

**स्थळ : बॅडमिंटन हॉल, सचिवालय जिमखाना, ६, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मुंबई - ४०० ०३२.**

## इतिवृत्त

सचिवालय जिमखाना, मुंबईची वार्षिक सर्वसाधारण सभा, सोमवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी सचिवालय जिमखाना, ६, जनरल जगन्नाथराव भोसले मार्ग, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२ येथे संपन्न झाली.

सभेच्या व्यासपीठावर श्री. सतीश जोंधळे, सभापती, श्री. अरविंद शेटे - उपसभापती, श्री.सुनिल आगरकर - मानद महासचिव, श्री. सतीश सोनवाने - मानद खजिनदार, श्रीमती मंगल नाखवा- मानद सहसचिव, श्री. मकरंद गयावळ - मानद सहसचिव, श्री. संजय पोफळे - मानद सहसचिव, श्री. संजय कदम, श्रीमती अपर्णा जाधव, श्री. मारुती कवालदार, श्री. जयदीप कामत, श्री. प्रविण मुंढे, श्री. प्रताप माडकर, श्री. चेतन चव्हाण मानद सचिव हे उपस्थित होते.

मानद महासचिव यांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले आणि असे प्रतिपादन केले की, आवश्यक गणसंख्येअभावी ही वार्षिक सर्वसाधारण सभा तहकूब करण्यात येत असून ३० मिनिटानंतर वार्षिक सर्वसाधारण सभा याच ठिकाणी होईल. तहकुबीनंतरच्या सभेला गणसंख्येची आवश्यकता असणार नाही.

तहकुबीनंतर वार्षिक सर्वसाधारण सभेस सायंकाळी ७.०० वाजता सुरुवात झाली. या वार्षिक सर्वसाधारण सभेस ५९ सभासद उपस्थित होते.

सभेच्या व्यासपीठावर श्री. सतीश जोंधळे - सभापती, श्री. अरविंद शेटे- उपसभापती, श्री.सुनिल आगरकर - मानद महासचिव, श्री. सतीश सोनवाने - मानद खजिनदार, श्रीमती मंगल नाखवा - मानद सहसचिव, श्री. मकरंद गयावळ - मानद सहसचिव, श्री. संजय पोफळे - मानद सहसचिव, श्री. संजय कदम, श्रीमती अपर्णा जाधव, श्री. मारुती कवालदार, श्री. जयदीप कामत, श्री. प्रविण मुंढे, श्री. प्रताप माडकर, श्री. चेतन चव्हाण मानद सचिव हे उपस्थित होते.

मानद महासचिव यांनी असे प्रस्तावित केले की, सचिवालय जिमखान्याचे पदसिध्द अध्यक्ष व पदसिध्द उपाध्यक्ष हे त्यांच्या कार्यबाहुल्यामुळे ७२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहू शकत नाहीत. त्यामुळे श्री. सतिश जोंधळे, मा. सभापती, सचिवालय जिमखाना यांनी सभेचे अध्यक्षपद स्वीकारावे असे त्यांनी प्रस्तावित केले.

वरील प्रस्तावास श्री अरविंद शेटे, उपसभापती यांनी अनुमोदन दिले.

श्री सतीश जोंधळे, सभापती यांनी सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारले. सभेच्या अध्यक्षांनी उपस्थित सर्व सभासदांचे स्वागत केले आणि सभेचे कामकाज सुरु करण्यास अनुमती दिली.

मानद महासचिव यांनी असे नमूद केले की, सचिवालय जिमखान्याच्या ७२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजी सचिवालय जिमखान्याच्या सूचना फलकावर प्रदर्शित करण्यात आली होती. त्याचप्रमाणे सर्वसाधारण सभेची सूचना व अहवाल सचिवालय जिमखान्याच्या संकेतस्थळावर (www.sachivalayagymkhana.com) त्याच दिवशी म्हणजेच दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजी प्रकाशित करण्यात आला. सभासदांचे सचिवालय जिमखान्याकडे जे पत्ते नोंदविण्यात आलेले आहेत त्या पत्त्यावर वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना दिनांक १५ सप्टेंबर २०२५ रोजी, टपालाव्दारे पाठविण्यात आली आहे. तसेच, वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल यांची लिंक (https://tinyurl.com/SGAGM2025) सर्व सभासदांना, त्यांनी सचिवालय जिमखान्याकडे नोंदविलेल्या मोबाईल क्रमांकावरील WhatsApp वर पाठविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दिनांक २५ सप्टेंबर २०२५ रोजीच्या “महाराष्ट्र टाईम्स” या मराठी वृत्तपत्रातसुध्दा वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

मानद महासचिव यांनी असे आवाहन केले की, ज्या सभासदांच्या जिमखान्याकडे नोंदविलेल्या पत्त्यांमध्ये किंवा मोबाईल क्रमांकामध्ये काही बदल झालेला असल्यास त्यांनी सचिवालय जिमखाना कार्यालयात तो अद्ययावत करावा.

मानद महासचिव यांनी छापिल अहवालात काही टंकलेखनाच्या दुरुस्त्या असल्याचे सांगितले त्या पुढीलप्रमाणे :-

१) पान क्रमांक २ - प्रपत्र - १ – श्री. सतीश जोंधळे, श्रीमती वैशाली सुळे, श्री. चेतन चव्हाण या स्वीकृत सदस्यांचा कालावधी दिनांक २२/०८/२०२४ ते ३१/०३/२०२५ असे टंकलिखित झाले आहे. त्याऐवजी दिनांक ०३/१०/२०२४ ते ३१/०३/२०२५ असे वाचावे.

२) पान क्रमांक ५ - सचिवालय जिमखान्याच्या सभासद वाढीकरीता दिनांक २३ ते २५ ऑक्टोबर २०२५ या ऐवजी दिनांक २३ ते २५ ऑक्टोबर २०२४ असे वाचावे.

३) पान क्रमांक ३९ – अखिल भारतीय नागरी सेवा टेबल टेनिस स्पर्धा २०२४-२५ (सहभाग) वरुन चौथी ओळ श्रीमती अंजली मातोडकर यांचे नाव श्रीमती अंजली माटोडकर असे वाचावे.

४)फोटो विभाग - पान ८ - अखिल भारतीय नागरी सेवा कुस्ती व कॅरम २०२४-२५ आयोजन या सदरातील कुस्ती स्पर्धेत श्री अमोल बुचके या ऐवजी "श्री. अमोल बुचडे" असे वाचावे.

५) फोटो विभाग - पान १५ - अखिल भारतीय नागरी सेवा योग स्पर्धा २०२४-२५ चंडीगड ऐवजी "चंदिगड" असे वाचावे.

६) फोटो विभाग - पान २० - अखिल भारतीय नागरी सेवा क्रिकेट स्पर्धा २०१९-२० ऐवजी "अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा व कला स्पर्धाचा सन्मान सोहळा" असे वाचावे.

सभेचे अध्यक्ष तथा सभापती यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेतील **विषय क्रमांक १ - सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल व परिक्षित लेखा विवरणपत्र आणि ताळेबंद सभेपुढे सादर करणे हा विषय चर्चेस घेण्याचे आवाहन केले.**

श्री. रविंद्र मंजुळे, श्री. तुषार हिर्लेकर, श्री. निलेश जाधव व इतर काही सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, जिमखान्याच्या आतापर्यतच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये किंवा इतर कोणत्याही संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये गतवर्षाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्ताचे वाचन व कार्यपूर्तता अहवाल सादर करणे हा विषय, विषय सूचीमध्ये प्रथम क्रमांकावर असतो. तथापि, फक्त याच वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सदर विषय अनुक्रमांक २ वर दर्शविलेला आहे, याचे कारण काय ?

सभेचे अध्यक्ष तथा सभापती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल व परिक्षित लेखा विवरणपत्र आणि ताळेबंद सभेपुढे सादर करणे या विषयावर चर्चा करण्यास सभासदांना अधिक वेळ मिळेल म्हणून तो प्रथम क्रमांकावर ठेवण्यात आलेला आहे. तथापि, सभासदांच्या मागणीनुसार सदर विषय क्रमांक २ वर आहे. असे गृहित धरुन सचिवालय जिमखान्याच्या दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्ताचे वाचन व कार्यपूर्तता अहवाल सादर करणे हा क्रमांक २ येथे दाखविण्यात आलेला विषय प्रथम चर्चेला घ्यावा. तसेच, पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेतसुध्दा पूर्वीच्याच पध्दतीनुसार हा विषय क्रमांक १ वर दर्शविण्यात येईल.

अध्यक्षांनी असेही निदर्शनास आणून दिले की, गतवर्षीच्या म्हणजेच दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील मुद्यांवर केलेली कार्यवाही पृष्ठ ३४ येथे नमूद करण्यात आलेली आहे त्याचे अवलोकन व्हावे.

श्री. शिरीष मोहोड यांनी असे निदर्शनास आणून दिले की, विषय क्रमांक बदलणे यात चुकीचे काही नाही. तथापि, गतवर्षीच्या सभेच्या कार्यवृत्तास मान्यता देणे हा विषय क्रमांक १ वरच असावयास पाहिजे. ज्या वेळेस जिमखान्याच्या निवडणूका असतात त्यावेळेस सभासदांना मतदानासाठी वेळ मिळावा म्हणून आपण क्रमांक ४ चा विषय, क्रमांक १ वर घेतो.

श्रीमती शाहीन काद्री, श्री. निलेश जाधव, श्री. संजीव केळुसकर, श्री. शिरीष मोहोड व इतर काही सभासदांनी असे प्रतिपादन केले की, सभापती तथा सभेचे अध्यक्ष हे सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यास सक्षम आहेत, त्यामुळे त्यांनीच सर्व प्रश्नांना उत्तरे द्यावीत आणि त्यामुळे राजशिष्टाचारसुध्दा पाळला जाईल.

**वरील चर्चेनंतर विषय क्रमांक २- सचिवालय जिमखान्याच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्ताचे वाचन व कार्यपूर्तता अहवाल सादर करणे हा प्रथम चर्चेला घेण्यात आला.**

श्री. अनंत सावंत यांनी अशी विचारणा केली की, गतवर्षीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उपाध्यक्ष तथा मुख्य सचिव यांनी अशी अपेक्षा व्यक्त केली होती की (पान १०, अनुक्रमांक १५) जिमखान्याचे सभासदत्व स्वीकारण्यामध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांस आकर्षण निर्माण झाले पाहिजे, अशी कृती सचिवालय जिमखान्याच्या कार्यकारिणी सदस्यांकडून अपेक्षित आहे. तसेच जिमखान्याच्या खेळाडूंना सरावासाठी सवलत मिळण्यासाठी काय पत्रव्यवहार केला ? त्याचे फलित काय ? यावर सचिवालय जिमखाना कार्यकारिणी सदस्यांनी काय कार्यवाही केली ? याचा उल्लेख आश्वासन पूर्ततेमध्ये (ATR) आलेला नाही.

श्रीमती शाहीन काद्री, श्री. शिरिष मोहोड, श्री. प्रदिप शर्मा व इतर काही सभासदांनी असे निदर्शनास आणून दिले की, सचिवालय जिमखान्याच्या दिनांक १६ ऑगस्ट २०२४ मध्ये उपस्थित करण्यात आलेले मुद्दे व त्यावरील कार्यवाही (ATR) फारच त्रोटक आणि अपूर्ण आहे. उपस्थित केलेले मुद्दे आणि त्यावर केलेली कार्यवाही हे तक्ता स्वरुपात देणे अपेक्षित आहे, अशी मागणी केली.

श्रीमती भारती कोरगांवकर यांनी खेदाने असे निदर्शनास आणून दिले की, गत वार्षिक सर्वसाधारण

सभेत कार्यकारिणी सदस्यांकडून असे सांगण्यात आले होते की, सचिवालय जिमखान्याच्या १०-१५ कि.मी परिघामधील राज्य शासकीय कार्यालयामध्ये जाऊन सभासद वाढीसाठी प्रयत्न करण्यात येतील. तथापि, एकाही कार्यकारिणी सदस्यांनी असे प्रयत्न केले नाहीत किंवा अशा कार्यालयांना एकही भेट दिली नाही.

त्यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की, सरावासाठी कार्यालयाकडून अनुमती दिली जात नाही त्यामुळे सचिवालय जिमखान्याच्या कार्यकारिणीने संबंधित खेळाडूंच्या विभाग प्रमुखांना वैयक्तिकरित्या भेटून, खेळाडूंना सरावासाठी कार्यालय लवकर सोडण्याची सवलत मिळण्यासाठी विशेष प्रयत्न करायला पाहिजेत.

श्रीमती रेंगडे यांनी असे प्रतिपादन केले की, अनेक कर्मचाऱ्यांनी आजीव सभासदत्वासाठी जिमखान्याकडे अर्ज केले होते तथापि, फक्त त्यांनाच आजीव सभासद करुन घेण्यात आले, इतरांना नाही, असे का ?

श्री भास्कर बनसोडे यांनी असे निदर्शनास आणून दिले की, गतवर्षीच्या अहवालामध्ये जिमखान्याचे सभासदत्व स्वीकारण्यामध्ये शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांस आकर्षण निर्माण झाले पाहिजे, अशी कृती सचिवालय जिमखान्याच्या कार्यकारिणी सदस्यांकडून अपेक्षित आहे, त्या संदर्भात ATR मध्ये कोणताही उल्लेख नसल्याबाबत विचारणा केली. तसेच जिमखान्याकडून दिव्यांग खेळाडूंसाठी काय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत किंवा त्यांना आजीव सभासद करुन घेण्यासाठी काय प्रयत्न करण्यात येत आहे अशी विचारणा केली.

श्री. सुनिल सूर्यवंशी यांनी ATR मध्ये सविस्तर माहिती असावी अशी सूचना केली.

श्री. अनंत सावंत यांनी अशी सूचना केली की, राज्य शासकीय कार्यालयात नव्याने नियुक्त झालेले अधिकारी/कर्मचारी हे मॅको बँकेचे खातेधारक होत असतात. अशा खातेधारकांना सचिवालय जिमखान्याचेसुध्दा सभासदत्व घेण्याबाबत / देण्याबाबत मॅको बँकेची मदत घेण्यात यावी.

श्री. संजीव केळुसकर यांनी असे निदर्शनास आणून दिले की, खेळाडूंना विशेष वेतनवाढीसंदर्भात मागील सर्वसाधारण सभेत चर्चा झाली होती त्या संदर्भात जिमखान्याने काय प्रयत्न केले याचा ATR मध्ये कोठेही उल्लेख नाही, तथापि, त्या संदर्भात आताच्या वार्षिक सर्वसाधारण सभेस उपस्थित सर्व सभासदांना अवगत करण्यात यावे.

सभापती तथा सभेचे अध्यक्ष यांनी वरील चर्चेला उत्तर देताना असे स्पष्ट केले की, सचिवालय जिमखान्याच्या १०-१५ कि.मी. परिघातील कार्यालयांमध्ये सभासद नोंदणीसाठी विशेष मोहिम राबविता

आली नाही तथापि, मंत्रालयामध्ये दिनांक २३ ते २५ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत सभासद नोंदणीसाठी विशेष मोहिम राबविण्यात आली. सदर मोहिमेमध्ये १६० शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी सभासदत्वाचे अर्ज घेतले होते. त्यातील १०३ पात्र अधिकारी/कर्मचारी यांनी आजीव सभासदत्व स्वीकारले. त्यातून जवळपास रुपये ५,१५,०००/- इतके उत्पन्न सचिवालय जिमखान्यास मिळाले.

अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेतील सांघिक तसेच वैयक्तिक खेळ प्रकारातील खेळाडूंना विशेष वेतनवाढ देण्याबाबत, सचिवालय जिमखान्याने दिनांक ८ जुलै २०२२, ०३ जुलै २०२३, दिनांक ०४ एप्रिल २०२४, ०५ ऑगस्ट २०२४, २६ जून २०२५ च्या पत्रान्वये क्रीडा विभागाकडे विशेष वेतनवाढ मिळण्यासाठी मागणी केली आहे. या पत्रांव्यतिरिक्त, क्रीडा विभाग तसेच वित्त विभागाचे अधिकारी यांच्या समवेत अनेक वेळा चर्चा करुन या गोष्टींचा पाठपुरावा केला आहे. तथापि, अतिरिक्त वेतनवाढीची संकल्पना सातव्या वेतन आयोगामध्ये काढून टाकलेली असल्यामुळे, सचिवालय जिमखान्याच्या प्रयत्नांना यश आलेले नाही. तथापि, त्याबाबत सतत पाठपुरावा चालू आहे.

अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धांच्या सरावासाठी कार्यालय लवकर सोडण्यास अनुमती मिळण्यासाठी २०१५ पासून सतत प्रयत्न चालू आहे. तथापि, शासकीय कार्यालयात वरचेवर कमी होत असलेली कर्मचारी संख्या, खेळांप्रती अधिकारी वर्गांची असलेली उदासिनता इत्यादी बाबींमुळे काही कार्यालयात कार्यालय लवकर सोडण्यास अनुमती दिली जाते तर काही कार्यालयामध्ये अशी अनुमती मिळत नाही. तरीही, लवकर कार्यालय सोडण्याची अनुमती मिळावी यासाठी सचिवालय जिमखान्याची कार्यकारिणी वैयक्तिकरित्या संबंधित कार्यालयास भेट देऊन खेळाडूंना सरावासाठी लवकर कार्यालय सोडण्यास अनुमती मिळविण्याबाबत प्रयत्नशील आहे.

त्याचप्रमाणे अखिल भारतीय नागरी सेवा नाट्य स्पर्धेच्या तालमीसाठी किंवा इतर नाट्य स्पर्धेच्या तालमीसाठी संबंधित कलाकारांना कार्यालय लवकर सोडण्याची परवानगी मिळावी म्हणून सचिवालय जिमखान्याने प्रयत्न केले आहेत. त्याचबरोबर रंगीत तालमीसाठी कमीत कमी ७ दिवसांची विशेष नैमित्तिक रजा मंजूर करावी याबाबत शासनाबरोबर पत्रव्यवहार केला आहे, चर्चा केली आहे आणि यापुढेही प्रयत्न चालू राहतील.

सभापती तथा सभेचे अध्यक्ष यांनी पुढे असे प्रतिपादन केले की, सचिवालय जिमखान्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नुतनीकरण करण्यात येत आहे. त्यातील काही भाग पूर्ण झाला आहे जसे की, उपहारगृह, बॅडमिंटन हॉल, इत्यादी. बॅडमिंटन हॉल गुरुकुल संस्थेस भाड्याने दिलेला आहे. उपहारगृह आणि बॅडमिंटन हॉल व्यवस्थित सुरु आहे आणि त्यांच्याकडून जिमखान्यास बऱ्यापैकी महसूल प्राप्त होत आहे.

तथापि, सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणाऱ्या नुतनीकरणास आता विलंब होत आहे म्हणून जिमखान्यातील पारंपरिक व्यायामशाळा किंवा काही बाबींचे/विभागाचे नुतनीकरण जिमखान्यामार्फत करण्याचे प्रस्तावित आहे.

सचिवालय जिमखान्याच्या आजीव सभासदांमध्ये भर पडावी म्हणून मुंबईतील मध्यवर्ती ठिकाणी किंवा ज्या ठिकाणी अधिक राज्य शासकीय कार्यालये आहेत जसे की, जे जे रुग्णालय, विक्रीकर कार्यालय, इत्यादी ठिकाणी काही दिवसांसाठी थोडीशी जागा उपलब्ध झाल्यास त्या ठिकाणी ३-४ दिवसांची विशेष मोहिम राबवून, आपल्यासारख्या उत्साही सभासदांची मदत घेऊन, आजीव सभासद वाढीसाठी प्रयत्न करण्यात येतील.

त्यांनी पुढे असे निदर्शनास आणून दिले की, मागील अनेक वर्ष आंतरकार्यालयीन स्पर्धा होऊ शकल्या नाहीत. त्याचे अहवाल वर्षात आयोजन करण्यात आले होते. तसेच अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत विशेष बक्षिस / प्राविण्य प्राप्त खेळाडूंचा अहवाल वर्षात सत्कार करण्यात आला, ज्यामुळे अनेक खेळाडूंना प्रोत्साहन मिळू शकेल.

सभापती, कार्यकारिणी सदस्य इतर काही सभासदांनी असे प्रतिपादन केले की, जिमखान्याच्या आजीव सदस्यांची संख्या वाढून सचिवालय जिमखान्यास फक्त थोडासा महसूल मिळेल तथापि, अशा सभासदांनी जिमखान्यातील उपलब्ध सोई सुविधांचा उपयोग करुन घेतला पाहिजे, जेणेकरुन त्यांना स्वत:लाही त्याचा फायदा होईल आणि जिमखान्यास खेळाडू उपलब्ध होऊ शकतील.

श्री. प्रशांत साजणीकर यांनी अशी विचारणा केली की, जिमखान्याचा हिरक महोत्सव लवकरच येत आहे. तो साजरा करण्यासाठी सचिवालय जिमखान्याकडून काय प्रयत्न करण्यात येत आहेत याचा ATR मध्ये कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही.

अध्यक्षांनी याबाबत असे स्पष्ट केले की, हिरक महोत्सव साजरा करण्यासाठी गतवर्षी रुपये ७ लाख वेगळ्याने काढून ठेवण्यात आले होते. तसेच अहवाल वर्षातसुध्दा रुपये ७ लाख वेगळ्याने काढून ठेवण्यात आले आहेत. पुढील वर्षीसुध्दा तेवढीच रक्कम बाजूस काढून ठेवण्यात येईल. हिरक महोत्सव कसा साजरा करावयाचा आहे यासंदर्भात सभासदांकडून लवकरच सूचना मागविण्याचे प्रस्तावित आहे.

त्यांनी पुढे असेही निदर्शनास आणून दिले की, त्यांनी स्वत: तसेच सचिवालय जिमखाना कार्यकारिणी सदस्यांनी क्रीडा संचालनालयातील अधिकाऱ्यांची दिनांक ६ नोव्हेंबर २०२४ रोजी बालेवाडी, पुणे येथे भेट घेऊन सचिवालय जिमखान्याच्या अडचणीसंदर्भात चर्चा केली आहे आणि त्यांना लेखीसुध्दा दिले

आहे. खेळाडू म्हणून नियुक्ती झालेल्या अधिकारी /कर्मचारी यांच्याबाबत त्यांनी असे स्पष्ट केले की, असे अधिकारी / कर्मचारी यांची सरावाची पध्दत आणि दर्जा हा थोडासा वर असतो. त्यांच्यापेक्षा वरच्या दर्जाच्या खेळाडू बरोबरच ते सराव करतात, त्यामुळे ते सचिवालय जिमखान्याच्या खेळाडूंबरोबर सराव करताना त्यांना अडचण येते. तथापि, असे सरळ सेवेने नियुक्त झालेले अधिकारी / खेळाडू हे अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे नेतृत्व आणि प्रतिनिधीत्व करण्यास तयार असतात.

सभापती यांनी असे आवाहन केले की, ज्या सभासदांना जिमखान्याच्या प्रगतीसाठी/सभासद वाढीसाठी काही सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी त्या सचिवालय जिमखान्याकडे लेखी स्वरुपात द्याव्यात म्हणजे त्यावर चर्चा करुन कार्यवाही करणे सोईस्कर होईल.

श्रीमती शाहीन काद्री यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सध्या सचिवालय जिमखान्याच्या वाचनालयामध्ये जी काही पुस्तके/कथा/कांदबऱ्या आहेत त्या ३०-४० वर्षापासूनच्या आहेत. नव्याने प्रकाशित झालेली पुस्तके/ कथा/ कादंबऱ्यासुध्दा वाचनालयात ठेवणे आवश्यक आहे. तसेच त्यामध्ये इंग्रजी पुस्तकांचासुध्दा समावेश असावा.

सभापती यांनी याबाबत असे प्रतिपादन केले की, सप्टेंबर २०२५ अखेर, २०१५-कादंबरी, १३०० - कथा संग्रह, १०० - आत्मचरित्र, ५०० - इंग्रजी पुस्तके, १०० - प्रवास वर्णन, ७५- नाटक इत्यादी पुस्तके आहेत. कोव्हिड नंतर म्हणजेच सन २०२२-२३ मध्ये रुपये २६,०००/- ची ५५ पुस्तके खरेदी करण्यात आली. त्यानंतर पुस्तके खरेदी करण्यात आलेली नाहीत. जी काही पुस्तके खरेदी करावयाची आहेत/अशी पुस्तके जिमखान्याच्या वाचनालयात असावीत असे सभासदांना वाटते त्यांनी त्याची यादी सचिवालय जिमखाना व्यवस्थापनाकडे दिल्यास निधीच्या उपलब्धतेनुसार त्यातील काही पुस्तके खरेदी करता येतील. त्यांनी पुढे असे आवाहन केले की, ज्या सभासदांकडे त्यांच्या घरी जुनी/नवी त्यांना नको असलेली सुस्थितीमधील पुस्तके असतील अशी पुस्तके त्यानी सचिवालय जिमखान्याच्या वाचनालयास दान द्यावीत.

श्रीमती शाहीन काद्री यांनी वाचनालय हा सचिवालय जिमखान्याचा महत्त्वाचा आणि अविभाज्य भाग असून वाचनालयाची सभासद संख्यासुध्दा अधिक आहे. अशा वाचनालयाकडे कार्यकारिणी सदस्यांकडून दुर्लक्ष होत असल्याबद्दल त्यांनी नाराजी व्यक्त केली.

श्री. शिरीष मोहोड यांनी ज्या कार्यकारिणी सदस्यांकडे वाचनालयाचे सचिव पद आहे त्यांच्या अनुपस्थितीबद्दल खेद व्यक्त केला.

श्री. शशांक साठे यांची अशी सूचना केली की, (१) जिमखान्याच्या आजीव सभासदांची संख्या

वाढविणे ही फक्त कार्यकारिणी सदस्यांची जबाबदारी नाही, स्वत: खेळाडूंनी पुढे येऊन जिमखान्याचे सभासदत्व स्वीकारले पाहिजे आणि त्याच्या आवडत्या खेळात सहभाग घेतला पाहिजे. (२) वाचन संस्कृती हा जरी आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग असला तरी परंपरागत कागदी पुस्तके खरेदी करण्याबरोबर Online वाचनालयासाठीसुध्दा आपण आता पुढाकार घेतला पाहिजे. (३) बुध्दिबळ विभागाचे मानद सचिव श्री. चेतन चव्हाण यांनी पुढाकार घेऊन बुध्दिबळाची जी आंतर कार्यालयीन स्पर्धा भरविली त्यास चांगला प्रतिसाद मिळाला. अशा प्रत्येक खेळातील स्पर्धा पुन्हा पुन्हा भरवावयास पाहिजेत जेणेकरुन खेळाडू सतत सक्रीय राहतील आणि त्यांना जिमखान्याच्या प्रती आत्मियता वाटेल. (४) बुध्दिबळाचा सराव हा Online सुध्दा करता येतो. बुध्दिबळाचे जे खेळाडू Online सराव करु इच्छितात त्यांना श्री शशांक साठे यांनी विनाशुल्क मार्गदर्शन करण्याची तयारी दर्शविली. (५) ब्रीज खेळाचासुध्दा Online सराव करु शकतो. पूर्वी अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेत महाराष्ट्राच्या ब्रीज संघाचा दबदबा होता कारण महाराष्ट्रातून चांगले खेळाडू तयार झाले होते. (६) बुध्दिबळ खेळाडूकडेच बुध्दिबळ विभागाचे मानद सचिव पद मिळल्यास तो मानद सचिव अधिक तन्मयतेने काम करेल.

श्री. रविंद्र मंजुळे यांनी अशी सूचना केली की, सचिवालय जिमखान्याने आता पुस्तकाबरोबरच Online वाचनालयाकडे वळले पाहिजे आणि त्यासाठी ४-५ किंडल उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

श्री. भारत वानखेडे यांची अशी सूचना केली की, सचिवालय जिमखान्याच्या वाचनालयात स्पर्धा परिक्षेची पुस्तकेसुध्दा उपलब्ध असावीत आणि त्याचबरोबर सचिवालय जिमखान्याच्या सभासदांना अभ्यासासाठी जिमखान्यात जागा उपलब्ध असावी.

श्री. विशाल जोंधळे यांनी अशी खंत व्यक्त केली की, नाट्य विभागाकडे कार्यकारिणी सदस्यांकडून पाहिजे तसे लक्ष दिले जात नाही. अनेक वर्षापासून आंतर कार्यालयीन /आंतर विभागीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले नाही, सचिवालय जिमखाना नाट्य निर्मितीसाठी आवश्यक असलेले लेखक, दिग्दर्शक, नेपथ्य, संगीतकार इत्यादी तयार करु शकला नाही/ तयार करण्यासाठी प्रोत्साहन देऊ शकला नाही. नाट्य विभाग अधिक सक्रीय राहण्यासाठी विविध एकांकिका स्पर्धा/अभिवाचन स्पर्धांचे सतत आयोजन करणे आवश्यक आहे.

श्रीमती स्वप्ना चव्हाण यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सचिवालय जिमखान्यात नाट्य विभागामध्ये उत्कृष्ट/अतिउत्कृष्ट हौशी तसेच व्यावसायिक कलाकार आहेत. तथापि, जिमखान्याकडून त्यांना योग्य तो प्रतिसाद मिळत नाही. कलाकारांची जिमखान्याकडून उपेक्षा होत आहे म्हणून ते जिमखान्यापासून दूर जात आहेत. जिमखाना नवीन कलाकार तयार करण्यात कमी पडत आहे. याचे

जिमखाना कार्यकारिणी सदस्यांनी आत्मपरिक्षण करावे. त्यांनी पुढे अशी सूचना केली की, जिमखान्याचा गायन विभाग सतत सक्रीय असतो, त्यामुळे जिमखान्याच्या कोणत्याही एका खेळाचा किंवा फक्त क्रीडा असा उल्लेख न करता कधीही उल्लेख करताना साहित्य, कला आणि क्रीडा असा उल्लेख करावा.

श्री. रामचंद्र गावडे यांनी अशी सूचना केली की, पॉवरलिफ्टिंगसाठी सध्याची जागा ही अतिशय गैरसोईची आहे, त्याचे छत हे पत्र्याचे आहे, त्यामुळे सराव करताना खेळाडू हे घामाधूम होतात. त्याचा परिणाम त्यांच्या खेळावर होतो आहे. सध्याची करोओकेची जागा ही पॉवर लिफ्टिंगच्या सरावासाठी राखीव होती. पॉवरलिफ्टिंग हा खेळाचा प्रकार असून कराओके हा खेळाचा प्रकार नसून तो हौशी प्रकारात मोडतो. सध्याची कराओकेसाठी जी जागा आहे ती पुन:श्च पॉवरलिफ्टिंगसाठी राखीव ठेवण्यात यावी. पॉवरलिफ्टिंगची जागा ही वातानुकूलीत असावी.

श्रीमती रेंगडे यांनी असे निदर्शनास आणून दिले की, अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेमध्ये अनेक वर्षापासून तेच ते खेळाडू किंवा कलाकार दिसत आहेत. त्यामुळे असे वाटते की, जिमखान्यास नवीन खेळाडू किंवा कलाकारांना संधी द्यावयाची नाही.

सभापती यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, सचिवालय जिमखान्याच्या नुतनीकरणाच्या प्रस्तावात पॉवरलिफ्टिंगच्या जागेचासुध्दा समावेश आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सचिवालय जिमखान्याच्या नुतनीकरणास विलंब होत असल्यामुळे पॉवरलिफ्टिंग जागेचे नुतनीकरण सचिवालय जिमखाना स्वत: करणार आहे. पॉवरलिफ्टिंग जागा ही शक्यतो तळमजल्यावरच असावी. पॉवरलिफ्टिंगच्या खेळाडूंना त्यांच्या जागेत काय काय सुविधा असाव्यात, त्याची यादी त्यांनी सचिवालय जिमखान्याच्या कार्यालयात उपलब्ध करुन द्यावी.

श्री. अनंत सावंत यांनी असे स्पष्ट केले की, अखिल भारतीय नागरी स्पर्धेच्या चाचणीसाठी जे खेळाडू येतात त्यांच्यातूनच स्पर्धेसाठी खेळाडू निवडले जातात. नवीन खेळाडू किंवा कलाकार चाचणीमध्ये सहभागी होत नसतील तर त्यामध्ये जिमखान्याचा दोष नाही. नवीन खेळाडूंना सहभागी करणे ही फक्त जिमखान्याची जबाबदारी नसून ती सूचना करणाऱ्या सभासदाची आणि प्रत्येक जिमखाना सभासदांची जबाबदारी आहे.

श्री. रविंद्र मंजुळे यांनी असे निदर्शनास आणून दिले की, जे सभासद म्हणतात की तेच ते चेहरे त्याना सदैव दिसतात, त्यांनी स्वत: निवडणूक लढवावी आणि कार्यकारिणीवर यावे. सध्या जी कार्यकारिणी आहे त्यांतील ७० टक्के कार्यकारिणी सदस्य हे राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू असून त्यांनी विविध स्पर्धेत बक्षिसे मिळवून महाराष्ट्राचे नाव मोठे केलेले आहे.

श्री. तुषार हिर्लेकर यांनीसुध्दा श्री. मंजुळे यांच्या म्हणण्यास अनुमोदन दिले.

श्री. भारत वानखेडे यांनी अशी सूचना केली की, पूर्वी मॅको बँकेने एकांकिका स्पर्धेचे आयोजन केले होते. त्या पध्दतीने त्यांची मदत घेऊन सचिवालय जिमखान्याने एकांकिका स्पर्धेचे आयोजन करावे.

श्री. मिलिंद पेडणेकर यांनी त्यांच्या कार्यकालात सचिवालय जिमखान्याने जी मदत केली, त्याबद्दल सचिवालय जिमखान्याचे आभार मानले. तसेच येथून पुढेही सचिवालय जिमखान्यास त्यांच्या मदतीची / मार्गदर्शनाची आवश्यकता वाटल्यास आपण ती करण्यास तयार असल्याचे सांगितले. त्यांनी पुढे अशी विनंती केली की, सचिवालय जिमखान्याच्या नाट्य विभागाची उच्च परंपरा आहे, सचिवालय जिमखान्याच्या नाट्य विभागाने अनेक बक्षिस प्राप्त कलाकृती निर्माण केल्या आहेत, त्यामुळे सचिवालय जिमखान्याचा नाट्य विभाग बंद होता कामा नये, तो सदैव सक्रिय रहावयास हवा.

श्री. प्रविण मुंढे, मानद सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, सचिवालय जिमखान्यातील पुस्तकांचा आढावा घेण्यात येईल. त्यातील जीर्ण झालेली जुनी पुस्तके काढून टाकून नवीन पुस्तकांचा वाचनालयामध्ये समावेश करण्यात येईल. Online पुस्तकांसाठी किंडल घेण्याबाबत विचार करण्यात येईल. कागदी स्वरुपात तसेच Online पुस्तके घेण्यासाठी सभासदांनी पुस्तकांची नावे सुचवावीत. जिमखान्याच्या सभासदांकडे किंवा त्यांच्या मित्रमैत्रिणींकडे जुनी वाचनीय पुस्तके असतील, ज्यांची त्यांना आता गरज नाही, अशी सुस्थितीतील पुस्तके त्यांनी जिमखान्यास दान करावीत. खेळाडू किंवा कलाकार घडावे लागतात, ते घडविले जात नाहीत, परंतू ते घडविण्यासाठी जिमखाना त्यांना मदत करेल. जिमखान्यामध्ये प्रत्येक खेळाच्या विभागास समान न्याय दिला जातो, भेदभाव केला जात नाही. प्रत्येक खेळ विभागाचे WhatsApp ग्रुप आहेत. त्यामधून जर कोणाचे नाव नजरचुकीचे कमी केले असेल तर त्यांनी ते जिमखान्याच्या नजरेस आणून द्यावे, त्यांचे नाव पुन:श्च WhatsApp ग्रुपमध्ये समाविष्ट करण्यात येईल. ज्या सभासदांना जिमखान्याच्या तेच ते चेहरे पाहण्याचा कंटाला आला असेल त्यांनी स्वत: निवडणूक लढवून निवडून यावे, त्यांचे स्वागत आहे.

श्री. चेतन चव्हाण, मानद सचिव बुद्धिबळ यांनी असे नमूद केले की, स्पर्धेसाठी उत्तमोत्तम खेळाडू उपलब्ध व्हावेत यासाठी, अखिल भारतीय नागरी सेवा (बुद्धीबळ) क्रीडा स्पर्धेसाठी खेळाडूंची निवड करताना, नेहमीपेक्षा दीर्घ कालावधीचे सामने खेळवले गेले. सदरहू निवड चाचणीस स्पर्धकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. खेळाडू प्रवर्गातून शासकीय सेवेत नियुक्त झालेले बहुतांश खेळाडू हे शासनाच्या विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक नसल्याचे दिसते, त्यामुळे अखिल भारतीय स्तरावरील पदकांना शासनास मुकावे लागते. त्यामुळे या खेळाडूंनीदेखील स्पर्धेत सहभागी व्हावे, असे निवेदन केले.

श्री. सतीश सोनवाने, मानद खजिनदार यांनी असे स्पष्ट केले की, अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेची निवड प्रक्रिया ही अत्यंत पारदर्शक असते. ज्यांना याबाबत काही शंका वाटते ते अशा निवड

प्रक्रियेची पाहणी करु शकतात. सचिवालय जिमखान्यामध्ये किंवा राज्य शासनामध्ये अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेसाठी नवोदित अधिकारी/कर्मचारी पाहिजे तेवढे सक्रीय नाहीत, त्यांना त्यामध्ये रस वाटत नाही त्यामुळे जे खेळाडू निवड प्रक्रियेमध्ये सामील होतात त्यामधूनच स्पर्धेसाठी निवड करण्यात येते.

श्रीमती शाहीन काद्री यांनी असे सांगितले की, सचिवालय जिमखान्याकडून त्यांच्या प्रत्येक सभासदाचा / स्पर्धकाचा सन्मान राखला गेला पाहिजे.

उपरोक्त चर्चेनंतर विषय क्रमांक २ जो प्रथम चर्चेसाठी घेण्यात आला होता - सचिवालय जिमखान्याच्या दिनांक १६ ऑगस्ट २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्ताचे वाचन व कार्यपूर्तता अहवाल सादर करणे - हा मंजूर करण्यात यावा असे श्री. मिलींद पेडणेकर व श्री. प्रकाश चौधरी यांनी प्रस्तावित केले. त्यास श्री. ज्ञानेश पाटमासे व श्री. रविंद्र मंजुळे यांनी अनुमोदन दिले.

सचिवालय जिमखान्याच्या दिनांक १६ ऑगस्ट, २०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे कार्यवृत्ताचे वाचन व कार्यपूर्तता अहवाल सादर करणे हा विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

**विषय क्रमांक १ जो विषय क्रमांक २ नंतर चर्चेसाठी घेण्यात आला - सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल व परिक्षित लेखा विवरणपत्र आणि ताळेबंद सभेपुढे सादर करणे.**

श्री. शरद फाटक यांनी अशी विचारणा केली की, Balance Sheet मधील Sources of Funds - Deposits & Other Liabilities या सदराखाली अहवाल वर्षात रु.७२,८५,८५७/- एवढी रक्कम दर्शविण्यात आली आहे तर Schedule 6 Current Assets Cash at Bank या सदरामध्ये अहवाल वर्षात रु.२३,३९,४४०/- एवढी रक्कम दर्शविण्यात आली आहे. या दोन्ही रक्कमेमध्ये जवळपास ३० ते ३५ लाखाचा फरक आहे, तो कशामुळे आलेला आहे.

श्री. प्रविण मुंढे मानद सचिव यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, Schedule 2 - Deposits & Other Liabilities-Sundry Creaditors या सदरामध्ये रु.६३,६७,०६९/- ही जी रक्कम दर्शविण्यात आलेली आहे त्यामुळे ३०-३५ लाखाचा फरक दिसतो आहे. महाराष्ट्र शासनाने सचिवालय जिमखान्यामार्फत अहवाल वर्षात दोन अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा आयोजित केल्या होत्या, त्याचे शासनाकडून येणे बाकी होते, जे ३१ मार्च, २०२५ नंतर सचिवालय जिमखान्याच्या खात्यामध्ये जमा झाले. त्यामुळे Sundry Creaditors मध्ये मोठी रक्कम दिसते आहे. ह्या ज्या दोन अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा सचिवालय जिमखान्यामार्फत आयोजित करण्यात आल्या होत्या, त्याचा तपशील पहायचा असल्यास जिमखान्याच्या कार्यालयात तो मिळू शकेल.

श्री. अनंत सावंत यांनी, Schedule 1, Funds & Reservs - Life & Patron Membership Fees या दरामध्ये मागील वर्षाच्या (रुपये १,६१,०१७/-) तुलनेत अहवाल वर्षात (रुपये ७,७४,७२६/-) भरीव वाढ झाल्याबद्दल जिमखान्याचे अभिनंदन केले आणि अशी विचारणा केली की, एवढी रक्कम कोणत्या कारणामुळे वाढली आहे. तसेच अहवाल वर्षात आजीव सभासदांकडून मिळालेली फीस आणि पुरस्कर्ते सभासद यांच्याकडून मिळालेली फीस वेगळ्याने दर्शविण्यात यावी.

श्रीमती शाहीन काद्री यांनीसुध्दा अशी मागणी केली की, विद्यार्थी सभासदांकडून मिळणारी फीससुध्दा वेगळी दर्शविण्यात यावी.

श्री. प्रविण मुंढे, मानद सचिव यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, सचिवालय जिमखान्याने मंत्रालय प्रांगणामध्ये जी विशेष मोहिम राबविली होती त्यामध्ये १०३ नवीन आजीव सभासद झाले. प्रत्येक आजीव सभासदाकडून रुपये ५०००/- प्रमाणे जी रक्कम जिमखान्यास प्राप्त झाली ती रुपये ५,१५,०००/- इतकी आहे. त्यामुळे Life & Patron Membership Fees मध्ये एवढी वाढ झालेली दिसते आहे. अहवाल वर्षात एकही Patron Member (पुरस्कर्ते) झालेले नाहीत. विद्यार्थी सभासदांकडून रुपये १,०००/- एवढी फीस आकारली जाते. पुढील वर्षापासून आजीव सभासद, विद्यार्थी सभासद आणि Patron Member कडून प्राप्त फीस वेगवेगळी दर्शविण्यात येईल.

श्री. प्रमोद पंडीत आणि श्री. तुषार हिर्लेकर यांनी अशी सूचना केली की, Schedule 1- Special Fund for 75th Anniversary या सदरामध्ये रुपये ७,००,०००/- दर्शविण्यात आलेले आहेत ते वेगळे करुन त्या रक्कमेची मॅको बँकेत ठेव स्वरुपात जमा केल्यास त्यावर अधिक व्याज मिळेल व त्यामुळे सचिवालय जिमखान्याच्या उत्पन्नात भर पडेल.

तसेच त्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, सचिवालय जिमखान्यास ५० वर्ष पूर्ण झाल्यावर जो कार्यक्रम केला होता त्यास फार मोठ्या प्रमाणात खर्च झाला. सदर कार्यक्रम आयोजनाचे आगाऊ नियोजन नसल्यामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागला.

सभापती तसेच श्री. प्रविण मुंढे, मानद सचिव यांनी उपरोक्त सूचनांची नोंद घेतली असून सचिवालय जिमखान्याच्या हिरक महोत्सवानिमित्त काही सूचना करावयाच्या असल्यास त्या लेखी स्वरुपात सचिवालय जिमखाना कार्यालयात देण्याची विनंती केली.

श्रीमती शाहीन काद्री यांनी Schedule 2 - Deposits & Other Liabilities - Deposit for Hall booking या सदरामध्ये रुपये ५०००/- एवढी कमी रक्कम कशी काय जमा झाली अशी

विचारणा केली असता श्री. प्रविण मुंढे मानद सचिव यांनी असे स्पष्ट केले की, जिमखान्याचे नुतनीकरण चालू होते त्यामुळे हॉल बंद होता. वर्षाच्या अखेरीस म्हणजेच दिनांक ३१ मार्च २०२५ अगोदर जमा झालेली ती रक्कम आहे.

श्री. तुषार हिर्लेकर यांनी अशी सूचना केली की, अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धेच्या आयेजनाची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून राज्यास/सचिवालय जिमखान्यास मिळते. सदर रक्कम जर सचिवालय जिमखान्याच्या खात्यामध्ये जमा झालेली असल्यास ती राज्य शासनाकडे कोठे व कशी जमा करावयाची आहे याबाबत त्वरीत माहिती घ्यावी. सदर रक्कम जर सचिवालय जिमखान्याच्या खात्यामध्ये जमा झाली तर ते राज्य शासनास परत करताना त्यावर त्यांनी व्याज मागितल्यास ते अडचणीचे होऊ शकते.

श्री. सुनिल सूर्यवंशी यांनी अशी सूचना केली की, हिरक महोत्सवासाठी रु.७,००,०००/- एवढी रक्कम दरवर्षी बाजूस काढून ठेवण्यास येत आहे, त्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे.

सभापती यांनी हिरक महोत्सवासाठी राखून ठेवत असलेल्या रकमेत वाढ करण्याचे प्रयत्न चालू आहेत, असे प्रतिपादन केले.

श्री. तुषार हिर्लेकर यांनी असे निदर्शनास आणून दिले की, Schedule 6, TDS या सदरामध्ये सन २०२२-२३ पासून रुपये २,६०,६३३/- एवढी रक्कम अद्यापही दर्शविलेली आहे. यामध्ये काहीतरी चूक आहे असते वाटते. या संदर्भात Chartered Accounts यांच्याशी चर्चा करावी.

श्री. शरद फाटक यांनी अशी विचारणा केली की, Schedule 6, Other Current Assets GST Electronic Cash Ledger या सदरामध्ये रुपये १,२६,९७४/- ही जी रक्कम दर्शविण्यात आलेली आहे, ती कशाची आहे ? या बाबत CA कडून माहिती घ्यावी कारण GST ची रक्कम वजा करुनच व्हेंडरला आपण देयके अदा करतो. त्यामुळे ही रक्कम या ठिकाणी Assets मध्ये का दर्शविली आहे हे समजून येत नाही.

श्री. प्रविण मुंढे, मानद सचिव यांनी याबाबत स्पष्ट केले की, या संदर्भात CA कडून विस्ताराने मार्गदर्शन घेण्यात येईल आणि त्याप्रमाणे Balance Sheet मध्ये सुधारणा करण्यात येईल, जी पुढच्या वर्षीच्या अहवाल वर्षात दिसून येईल.

श्री. अनंत सावंत यांनीही अशी सूचना केली की, CA शी चर्चा करुन, त्यांचे मार्गदर्शन घेऊन Balance Sheet मधील असे मुद्यांचे निरसन करुन घ्यावे, जेणेकरुन सभासदांच्या मनात कोणतीही शंका राहणार नाही.

श्री. सुनिल सूर्यवंशी यांनी अशी सूचना केली की, Schedule 7 Eectricity या सदरामध्ये अहवाल वर्षात रुपये १,१८,४२६/- दर्शविण्यात आले आहेत जे मागील वर्षापेक्षा तिप्पट आहेत. विजेचे देयक जर एवढ्या मोठ्या प्रमाणात येत असेल तर जिमखान्याने सौर उर्जा वापरण्याचा प्रयत्न करावा / निर्णय घ्यावा.

श्री प्रविण मुंढे, मानद सचिव यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, जी विद्युत देयकाची रक्कम दर्शविण्यात आली आहे ती विद्युत अनामत रक्कम आहे, वीज वापराची नाही.

श्री. प्रमोद पंडीत यांनी असे निदर्शनास आणून दिले की, Schedule 6 मध्ये रुपये २३,३९,४४०/- एवढी मोठी रक्कम Cash at Bank या सदरामध्ये दर्शविण्यात आलेली आहे, ती बचत खात्यामध्ये न ठेवता सदर रक्कम Fixed deposit मध्ये ठेवली असती तर अधिक व्याज मिळू शकले असते.

श्री. प्रविण मुंढे, मानद सचिव यांनी याबाबत स्पष्ट केले की, सदर रक्कम केंद्र शासनाकडून आलेली आहे, त्याचे पुढे काय करावयाचे आहे त्याबाबत क्रीडा आयुक्त यांचेकडून मार्गदर्शन मागितले आहे.

श्री. प्रशांत साजणीकर यांनी अशी विचारणा केली केली, इतर फिसच्या मानाने टेबल टेनिस मधील फीस कमी प्रमाणात प्राप्त झाली आहे. त्यावर सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, सध्या टेबल टेनिस खेळाडूंची संख्या कमी आहे. सरावासाठी कोणी खेळाडू येत नाहीत म्हणून टेबल टेनिस हॉल सध्या भाड्याने दिलेला आहे. त्यामुळे फीस कमी प्रमाणात जमा झाली आहे. तथापि, टेबल टेनिसचा विभाग बंद पडू नये यासाठी प्रयत्न चालू आहेत.

श्री. तुषार हिर्लेकर यांनी अशी विचारणा केली की, Schedule 7, Receivable from Govt. Against Sports Activities या सदरामध्ये रुपये ७४,६७,६५६/- एवढी मोठी रक्कम दर्शविण्यात आलेली आहे ती अहवाल वर्षात किंवा त्यानंतर तरी जिमखान्यास प्राप्त झाली आहे किंवा कसे ?

सभापतींनी याबाबत स्पष्ट केले की सदर रक्कम जिमखान्यास ३१ मार्च २०२५ नंतर प्राप्त झाली आहे.

श्री. रविंद्र मंजुळे यांनी मागील वर्षाच्या रुपये २६,६९५/- च्या तुलनेत अहवाल वर्षात रुपये १,१६,५४९/- फीस जमा केल्याबद्दल संगीत विभागाच्या मानद सचिवांचे अभिनंदन केले.

श्रीमती मंगल नाखवा, मानद सचिव, नृत्य व संगीत यांनी याबाबत असे प्रतिपादन केले की, कराओकेसाठी उत्कृष्ट प्रतिसाद मिळत आहे. त्याचबरोबर शास्त्रीय संगीत शिकण्यासाठी अधिक प्रतिसाद मिळत आहे.

श्री. गजाजन सावंत यांनी टेबल टेनिस, फूटबॉल आणि कबड्डी खेळास सभासदांकडून अत्यल्प प्रतिसाद मिळत असल्याबाबत खंत व्यक्त केली आणि अशी सूचना केली की, ज्या खेळासाठी शून्य रक्कम फीस स्वरुपात जिमखान्यास मिळाली आहे त्या खेळांच्या विभाग सचिवांनी हे प्रकरण गांभीर्याने घेतले पाहिजे आणि खेळाडूंच्या वतीने संबंधित विभाग सचिवांनी थोडीतरी फीस जिमखान्याकडे जमा केली पाहिजे.

सभापती यांनी असे निदर्शनास आणून दिले की, पूर्वी शासकीय मध्यवर्ती मुद्रणालयाचे अधिकारी / कर्मचारी कबड्डी खेळत होते, ते बहुतेकजण आता सेवानिवृत्त झाले आहेत किंवा त्यांनी कबड्डी खेळणे बंद केले आहे. नव्याने होणाऱ्या नियुक्त्या कमी प्रमाणात होत आहेत आणि त्यांना कबड्डी खेळण्यात रस नाही. तरीसुध्दा श्री. मदन बावसकर यांनी पुढाकार घेतला तर कबड्डीचा संघ नव्याने तयार होऊ शकतो.

श्रीमती शाहीन काद्री यांनी अशी सूचना केली की, जिमखान्याच्या आवारामध्ये ज्या ठिकाणी वाहन पार्कींग आहे त्या ठिकाणी कबड्डीच्या सरावासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. वास्तविक पाहता कबड्डी हा खेळ जागतिक पातळीवर पोहोचलेला आहे त्यामुळे त्यास प्रतिसाद मिळेल.

सभापती यांनी असे नमूद केले की, जिमखान्याचा कबड्डी संघ तयार करण्यास श्री. मदन बावस्कर यांनी पुढाकार घ्यावा.

सभापतीनी फुटबॉल संघाबाबत असे नमूद केले की, यावर्षी फुटबॉलची फीस जमा झाली नाही. पूर्वी जिमखान्याचा फुटबॉलचा संघ होता परंतू त्यांतील खेळाडू वयस्क झाल्यामुळे त्यांनी फुटबॉल सोडले आहे. तथापि फुटबॉल संघ बांधणीसाठी कोणी पुढाकार घेतल्यास त्यास मदत करण्यात येईल.

श्रीमती शाहीन काद्री यांनी अशी विचारणा केली की, Schedle 11. Royalties & Donations Received - Royalty from Fitness Zone / Sachivalaya Fitness या सदरामध्ये गतवर्षी रुपये ४,२५,३३९/- इतकी रक्कम सचिवालय जिमखान्यास प्राप्त झाली होती तर अहवाल वर्षात त्यामध्ये वाढ अपेक्षित असताना रुपये ४,१०,४०३/- म्हणजेच जवळपास रुपये १५ हजार इतकी कमी रक्कम सचिवालय जिमखान्यास प्राप्त झाली आहे, याचे कारण काय ?

त्यांनी पुढे अशी विचारणा केली की, उपहारगृह कंत्राटदारामध्ये बदल झालेला आहे तसाच बदल सजावटकारामध्ये झालेला आहे का ? पूर्वीचेच कंत्राटदार सध्यासुध्दा आहेत. त्याचप्रमाणे ज्याप्रमाणे उपहारगृह कंत्राटदाराचे नाव Balance Sheet मध्ये दर्शविले आहे त्याचप्रमाणे सजावटकाराचे नाव सुध्दा Balance Sheet मध्ये दर्शवावे.

सभापती यांनी याबाबत असे स्पष्टीकरण दिले की, अहवाल वर्षात जवळपास ५-६ महिने जिमखान्याचे नुतनीकरण चालू होते त्यामुळे जिम्नॅशियम बंद होते. म्हणून जिम्नॅशियमला रॉयल्टी भरण्यात अल्पशी सवलत देण्यात आली होती. उपहारगृहाचे कंत्राट जून २०२५ मध्ये देण्यात आले असून ते तीन वर्षासाठी आहे. सजावटकाराचे कंत्राट पुढील वर्षी संपत आहे. त्यासाठी निविदा प्रक्रिया राबवूनच नवीन कंत्राट देण्यात येईल.

श्री. भारत वानखेडे यांनी अशी विचारणा केली की, वाचनालय हा सचिवालय जिमखान्याचा एक विभाग आहे. तथापि, सर्व खेळांचा समावेश Schedule 8 मध्ये दर्शविलेला आहे तर वाचनालय फिसचा समावेश Schedule 9 -General Fees या सदरामध्ये करण्याचे कारण काय ?

सभापतींनी याबाबत असे स्पष्ट केले की, वाचनालय हा जिमखान्याचा एक भाग असला तरी वाचनालय हा खेळ प्रकारात मोडत नाही. त्यामुळे वाचनालयाची फीस ही वेगळ्याने दर्शविलेली आहे.

श्री. शरद फाटक व इतर अनेक सभासदांनी सजावटकार व उपहारगृह कंत्राटदार यांची नावे वार्षिक अहवालात दर्शवू नयेत, असे सुचविले कारण त्यांची नावे अहवालात दर्शविली तर त्यांची मोफत प्रसिध्दी होणार आहे.

श्री. सुनिल सूर्यवंशी यांनी जिमखान्यातील रद्दी/भंगार लवकरात लवकर विकण्यास सुचविले. तसेच त्यांनी पुढे अशी सूचना केली की, मागील वर्षाच्या रुपये ६,६३,४६५/- तुलनेत अहवाल वर्षात रुपये ८,१४,२८३/- वीज देयके प्राप्त झाली आहे. सचिवालय जिमखान्याने वीजेवरील खर्च कमी करण्यासाठी सौर उर्जेचा पर्याय स्वीकारावा.

सभापती यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, सौर उर्जेच्या पर्यायाची नोंद घेण्यात आली आहे. अहवाल वर्षात विजेचे दरामध्ये वाढ झालेली आहे त्यामुळे गतवर्षापेक्षा अहवाल वर्षात विजेचे देयक अधिक दिसते आहे.

श्रीमती शाहीन काद्री यांनी अशी विचारणा केली की, Schedule 14 Staff Salaries and Allowances सदरामध्ये मागील वर्षापेक्षा अहवाल वर्षात जवळपास तीन लाखाने वाढ दर्शविण्यात आलेली आहे, ती नवीन कर्मचारी वर्ग भरतीमुळे दिसते आहे की जिमखान्याच्या कर्मचारी वर्गास वेतन वाढीमुळे दिसते आहे.

सभापती यांनी याबाबत असे स्पष्ट केले की, अहवाल वर्षात फक्त एका चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्याची नव्याने नियुक्ती करण्यात आलेली आहे तसेच जिमखान्यातील कर्मचारी वर्गाच्या वेतनामध्ये काही अंशी वाढ

करण्यात आली आहे. त्यामुळे तो खर्च अधिक दिसतो आहे. जिमखान्याच्या कर्मचारी वर्गाच्या वेतनामध्ये शासनाच्या नियमानुसार वेतनवाढ करण्यात येत नाही तर जिमखान्याच्या उत्पन्नावर आधारीत जिमखान्याच्या कर्मचारीवर्गाची वेतनवाढ करण्यात येते.

श्रीमती शाहीन काद्री, श्री शिरीष मोहोड व इतर काही सभासदांनी असे सूचविले की, सचिवालय जिमखान्याच्या कर्मचारीवर्गास एका सुत्रानुसार वेतनवाढ व्हावयास पाहिजे, कार्यकारिणी सदस्यांच्या मर्जीनुसार नाही. तसेच सचिवालय जिमखान्याचे उत्पन्न आणि जिमखान्यातील कर्मचारी वर्गाचे वेतन याची एकमेकाशी सांगड घालू नये, ठराविक सुत्रानुसार किंवा १० टक्के वाढ करुन दरवर्षी सचिवालय जिमखान्यातील अधिकारी / कर्मचारी यांना वेतनवाढ मिळाली पाहिजे.

मानद महासचिव यांनी सचिवालय जिमखान्याच्या अधिकारी / कर्मचारी वर्गास वेतनाविषयीचे एक सूत्र ठरविण्यात येईल, असे आश्वासन दिले.

श्री. अनंत सावंत यांनी अशी विचारणा केली की, Schedule 14 मध्ये Security Charges या सदराखालील गतवर्षी रुपये ३,८२,४५२/- इतका खर्च दाखविण्यात आला होता तर अहवाल वर्षात तो शून्य दर्शविण्यात आला आहे, याचे कारण काय ?

सभापतींनी याबाबत असे निदर्शनास आणून दिले की, अहवाल वर्षात सचिवालय जिमखान्याच्या उपाध्यक्ष तथा मुख्य सचिव यांनी सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरक्षा सेवा उपलब्ध करुन दिल्या होत्या, त्यामुळे त्यावरील खर्च निरंक आहे.

श्री. अनंत सावंत यांनी Annexure to Audit Report मधील तिसऱ्या क्रमांकाच्या मुद्याकडे कार्यकारिणी समितीचे लक्ष वेधले असता श्री. प्रविण मुंढे, मानद सचिव यांनी असे सांगितले की, ती हिशोब तपासणीची भाषा आहे, त्यामध्ये वावगे काही नाही.

श्री. रुपेश पालवे यांनी सर्व पदक प्राप्त खेळाडूंचे अभिनंदन केले तसेच सचिवालय जिमखान्याच्या कार्यकारिणी सदस्यांनी पदक मिळविण्यासाठी सर्व खेळाडूंना प्रोत्साहन दिल्याबद्दल कार्यकारिणी सदस्यांचेही अभिनंदन केले.

श्री. ज्ञानेश पाटमासे यांनी कार्यकारिणी सभासदांनी जिमखान्याच्या उन्नतीसाठी पूर्ण क्षमतेने कार्य केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले.

वरील चर्चेनंतर सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल व परिक्षित लेखा विवरणपत्र आणि ताळेबंद सभेपुढे सादर करणे या विषयास मंजूरी देण्याबाबत श्रीमती शाहीन काद्री यांनी प्रस्तावित केले त्यास श्रीमती भारती कोरगांवकर यांनी अनुमोदन दिले.

सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल व परिक्षित लेखा विवरणपत्र आणि ताळेबंद सभेपुढे सादर करणे हा विषय सर्वानुमते संमत करण्यात आला.

**विषय क्रमांक ३ : सन २०२५-२६ करीता लेखा परीक्षकांची नियुक्ती करणे.**

मानद खजिनदार यांनी असे प्रस्तावित केले की, सन २०२४-२५ करीता जिमखान्याचे लेखा परीक्षक म्हणून श्री. एन. बी. चव्हाण, मेसर्स सी. जे. के. असोसिएट्स, चार्टड अकाऊटंट, ६९/११, जिवितेश निवास, तरुण भारत सोसायटी, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०० ०९९ हे काम पहात आहेत. त्यांची तीन वर्षे पूर्ण झाली आहेत. आता सन २०२५-२६ करीता जिमखान्यास लेखा परीक्षकांची नव्याने नियुक्ती करावयाची आहे.

श्री. रुपेश पालवे यांनी सन २०२५-२६ साठी लेखा परीक्षकांची नियुक्ती करण्याचे अधिकार व्यवस्थापकीय समितीस देण्यात यावे असे प्रस्तावित केले त्यास श्री. विवेक कुरमुडे यांनी अनुमोदन दिले.

सन २०२४-२५ करीता लेखा परीक्षकांची नियुक्ती करण्याचे अधिकार सचिवालय जिमखान्याच्या व्यवस्थापकीय समितीस देण्याच्या ठरावास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

**विषय क्रमांक ४ : अध्यक्षांच्या परवानगीने इतर कामकाज.**

१. श्री. अनंत सावंत, आजीव सभासद क्र. L-S-161 यांनी असा मुद्दा मांडला की, सचिवालय जिमखान्याच्या माजी पदसिद्ध उपाध्यक्षा तथा मा. मुख्य सचिव श्रीमती सुजाता सौनिक यांनी जिमखान्यातील विविध विकास कामाबाबत सकारात्मक भूमिका घेऊन वैयक्तिक लक्ष देऊन, जिमखान्याच्या सुविधांमध्ये विविध सुधारणा केल्या याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव मांडला. श्री. रुपेश पालवे L-S-579 यांनी या स्वरुपाच्या ठरावास अनुमोदन दिले.

श्रीमती सुजाता सौनिक, तत्कालीन मुख्य सचिव तथा उपाध्यक्ष सचिवालय जिमखाना यांनी सचिवालय जिमखान्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

२. श्री. अरविंद शेटे, उपसभापती यांनी जाहिर केले की आज दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सचिवालय जिमखान्याच्या उपविधीतील नियम क्र. ४,१९,२१,२८ व ३० मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव मांडला होता. त्यास बहुमताने मंजुरी देण्यात आली आहे. सदर सुधारणांना या वार्षिक सर्वसाधारण सभेची मंजूरी कृपया मिळावी.

श्री. सुनिल आगरकर, महासचिव यांनी असे नमूद केले की, सध्याच्या व्यवस्थापकीय समितीची मुदत

दिनांक ३० सप्टेंबर २०२५ रोजी संपत आहे. आज दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजी पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत जे ठराव मंजूर करण्यात आलेले आहेत, त्यानुसार सचिवालय जिमखान्याच्या नियमावली / उपविधीमध्ये सुधारणा होणे आवश्यक आहे आणि त्यानुसार निवडणूक होईल. विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर करण्यात आलेल्या सुधारणा, नियमानुसार मा. धर्मादाय आयुक्त यांना कळविण्यात येतील आणि त्यानुसार सचिवालय जिमखान्याच्या नियमावलीमध्ये त्या सुधारणांचा समावेश करावा लागेल. यासाठी काही कालावधी लागणार आहे. तोपर्यत सध्याच्या व्यवस्थापकीय समितीस मुदतवाढ द्यावी लागणार आहे. विशेष सर्वसाधारण सभेत उपविधीमध्ये ज्या काही सुधारणा मंजूर करण्यात आल्या आहेत त्या मा.धर्मादाय आयुक्त यांना कळवून, सुधारणा मंजूर होण्याच्या आधीन राहून, निवडणूक घेता येईल काय याचीही विचारणा मा. धर्मादाय आयुक्त यांना करण्यात येईल. जर तसेच शक्य असेल तर निवडणूक घेण्यासाठी जो काही किमान अवधी लागणार आहे, तो विचारात घेऊन त्या कालावधीपर्यत सध्याच्या व्यवस्थापकीय समितीस मुदतवाढ देण्यात यावी, असे त्यांनी प्रस्तावित केले.

श्री. तुषार हिर्लेकर, श्री. शिरीष मोहोड व इतर काही सभासदांनी असे निदर्शनास आणून दिले की, जोपर्यत निवडणूक होत नाही तोपर्यत सध्याची व्यवस्थापकीय समिती कार्यरत राहील, अशी तरतूद जिमखान्याचे नियमावलीमध्ये आहे. त्यामुळे, निवडणूक होऊन नवीन कार्यकारिणी स्थापन होईपर्यत सध्याच्या व्यवस्थापकीय समितीनेच कामकाज पहावे.

उपरोक्त सर्व चर्चेअंती विशेष सर्वसाधारण सभेमध्ये झालेल्या ज्या काही सुधारणा मंजूर करण्यात आल्या आहेत. त्या मा. धर्मादाय आयुक्त यांना कळवून, सुधारणा मंजूर होण्याच्या आधीन राहून, निवडणूक घेता येईल काय याचीही विचारणा मा. धर्मादाय आयुक्त यांना करण्यात येईल. त्यांच्या अनुमतीनंतर निवडणूक प्रक्रीया राबवावी. झालेल्या सर्व सुधारीत सुधारणांना मान्यता देण्यात यावी. निवडणूक होऊन नवीन कार्यकारिणी स्थापन होईपर्यंत सध्याच्या व्यवस्थापकीय समितीनेच कामकाज पहावे.

सुचक :- श्री. शिरीष मोहोड

अनुमोदक :- श्री. तुषार हिर्लेकर

३. कार्यकारिणीचे मनोगत तथा आभार प्रदर्शन.

सभापती, उपसभापती, मानद महासचिव यांनी जिमखान्याची व्यवस्थापकीय समिती, सर्व सभासद, जिमखान्याचे कर्मचारी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच नवीन येणाऱ्या व्यवस्थापकीय समितीससुध्दा असेच चांगले सहकार्य करण्याचे आवाहन केले.

श्री. सतीश जोंधळे, सभापती यांनी वरील चर्चेनंतर असे प्रतिपादन केले की, सभासदांनी ज्या काही भावना व्यक्त केल्या आहेत त्या जिमखान्याच्या प्रेमापोटी आणि जिमखान्याच्या कार्यात सुधारणा व्हावी म्हणूनच केल्या आहेत, त्याची पूर्ण आदराने अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला जाईल. उपविधीमध्ये ज्या काही सुधारणा सुचविलेल्या आहेत/केलेल्या आहेत त्यास प्रथमत: मा. धर्मादाय आयुक्त यांची मान्यता घ्यावी लागेल / त्यांना कळवाव्या लागतील. त्यानंतरच या सुधारणांची अंमलबजावणी होऊ शकेल. त्यांनी पुढे असे नमूद केले की, त्यांना मुख्य सचिव तथा पदसिद्ध उपाध्यक्ष, सचिवालय जिमखान्याची व्यवस्थापकीय समिती, जिमखान्याचे सर्व सभासद यांनी त्यांना केलेली मदत, सहकार्य, मार्गदर्शन इत्यादींबद्दल ते सर्वांचे ऋणी आहेत.

व्यवस्थापकीय समितीने सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानले आणि सर्वसाधारण सभेची सांगता झाल्याचे जाहीर केले.

( सुनिल आगरकर ) ( सतीश जोंधळे )

मानद महासचिव सभापती

सचिवालय जिमखाना, मुंबई

★★★★

# सचिवालय जिमखान्याच्या दिनांक २९ सप्टेंबर, २०२६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेतील आश्वासन पूर्तता.

- वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कार्यवृत्ताचे वाचन व कार्यपूर्तता अहवाल विषय क्रामांक १ वर घेण्यात आला आहे.
- पारंपारिक व्यायामशाळेच्या नुतनीकरणाचे काम जिमखान्याने केले आहे.
- सभासदांच्या सूचना विचारात घेऊन नवीन पुस्तके खरेदी करण्यात आली आहेत.
- आजीव सभासद, विद्यार्थी सभासद आणि आश्रयदाते सभासद यांची वर्गणी वेगळ्याने दर्शविण्यात आली आहे.

....................

## अखिल भारतीय नागरी सेवा खो-खो स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन

केंद्र शासनाच्या विद्यमाने, महाराष्ट्र शासनाच्या वतीने तसेच सचिवालय जिमखान्याच्या माध्यमातून दिनांक १९ ते २२ मार्च, २०२६ या कालावधीत शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी, पुणे येथे अखिल भारतीय नागरी सेवा खो-खो स्पर्धा २०२५-२६ चे यशस्वी आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र शासनाला ही प्रतिष्ठेची स्पर्धा आयोजित करण्याचा मान प्रथमच मिळाला, ही बाब राज्यासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरली. या स्पर्धेसाठी स्पर्धा सचिव म्हणून श्री. जयदीप कामत व स्पर्धा सहसचिव म्हणून श्री. प्रताप माडकर यांची नियुक्ती करण्यात आली होती.

या स्पर्धेत देशाच्या विविध भागांतील एकूण ३८ संघांनी सहभाग नोंदविला. त्यामध्ये २१ पुरुष आणि १७ महिला संघांचा समावेश होता. स्पर्धेतील खेळाचा दर्जा अत्यंत उच्च प्रतीचा होता. त्यामुळे पुणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील खो-खोप्रेमींमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला.

स्पर्धेच्या आयोजनासाठी शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे दोन स्पर्धा मैदाने उपलब्ध करून देण्यात आली होती, तसेच सरावासाठी स्वतंत्र मैदानाचीही व्यवस्था करण्यात आली होती. महाराष्ट्र राज्य खो-खो असोसिएशनच्या सहकार्याने नियुक्त करण्यात आलेल्या मुख्य पंचांसह ३० पंचांच्या पथकाने स्पर्धेचे कामकाज अत्यंत सुरळीत, शिस्तबद्ध आणि कार्यक्षमतेने पार पाडले.

स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक १९ मार्च, २०२६ रोजी संपन्न झाला. या समारंभाचे उद्घाटन पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. श्री. गजानन पाटील (भा.प्र.से.) यांच्या हस्ते झाले. यावेळी मुख्य संपर्क अधिकारी श्री. राजेंद्र साप्ते तसेच सचिवालय जिमखाना कार्यकारिणी समितीचे सदस्य उपस्थित होते. स्पर्धेतील सर्व खेळाडूंना भारताच्या महिला खो-खो संघाच्या कर्णधार श्रीमती प्रियंका इंगळे आणि भारताच्या पुरुष खो-खो संघाचे खेळाडू श्री. सुयश गरगटे यांनी क्रीडा शपथ दिली.

स्पर्धेदरम्यान सहभागी खेळाडू व अधिकारी यांची चहा, नाश्ता व भोजनाची उत्तम व्यवस्था करण्यात आली होती. दिनांक २२ मार्च, २०२६ रोजी समारोप व पारितोषिक वितरण समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या कार्यक्रमास मा. श्री. अरुण उन्हाळे, निवृत्त, भा.प्र.से. अधिकारी, प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे येथील मुख्य संपर्क अधिकारी श्री. राजेंद्र साप्ते यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली.

सचिवालय जिमखान्याचे कार्यकारिणी सदस्य, स्वयंसेवक आणि संबंधित अधिकारी यांच्या अथक परिश्रम, नियोजनबद्ध कार्यपद्धती आणि उत्कृष्ट सांघिक समन्वयामुळे स्पर्धेचे आयोजन अत्यंत यशस्वीरीत्या पार पडले. स्पर्धेतील सहभागी संघांनी पाहुणचार आणि उपलब्ध करून देण्यात आलेल्या सुविधांबद्दल समाधान व्यक्त करत सचिवालय जिमखान्याच्या आयोजनाची मुक्तकंठाने प्रशंसा केली.

केंद्रीय सिव्हील सेवा सांस्कृतिक व क्रीडा मंडळ, नवी दिल्ली आणि महाराष्ट्र शासन यांच्यात प्रभावी समन्वय साधून स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी मोलाचे सहकार्य करणारे संयोजक (Convener) श्री. राज कुमार यांचे सचिवालय जिमखान्यातर्फे मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले तसेच या स्पर्धेच्या यशात योगदान देणारे सर्व अधिकारी, पंच, स्वयंसेवक, सहाय्यक कर्मचारी आणि सहकार्य करणाऱ्या सर्व संस्थांचेही विशेष आभार मानण्यात आले.

या स्पर्धेतील सर्वात अभिमानास्पद बाब म्हणजे महाराष्ट्र राज्याच्या पुरुष व महिला या दोन्ही संघांनी उत्कृष्ट सांघिक खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकाविले आणि महाराष्ट्राच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला.

**स्पर्धेचा निकाल**

| | **पुरुष संघ** | **महिला संघ** |
|---|---|---|
| **विजेता** | महाराष्ट्र | महाराष्ट्र |
| **उप विजेता** | आर.एस.बी., मुंबई | हरियाणा |
| **तृतीय क्रमांक** | हरियाणा | ओडिसा |
| **विभागून** | आंध्र प्रदेश | आर.एस.बी., मुंबई |

| **वैयक्तिक पुरस्कार** | | |
|---|---|---|
| | **पुरुष संघ** | **महिला संघ** |
| सर्वोत्कृष्ट अष्टपैलू | फैजाखाँ पठाण | प्रियंका इंगळे (महाराष्ट्र) |
| सर्वोत्कृष्ट आक्रमणपटू | सचिन भार्गव (आर.एस.बी.मुंबई) | संपदा मोरे (महाराष्ट्र) |
| सर्वोत्कृष्ट बचावपटू | अक्षय भांगरे (महाराष्ट्र) | मीनू (हरियाणा) |

## अखिल भारतीय नागरी सेवा खो-खो स्पर्धा २०२५-२६ मध्ये महाराष्ट्राच्या पुरुष व महिला संघांचे दुहेरी सुवर्णयश

दि. १९ ते २२ मार्च २०२६ या कालावधीत पुणे येथील शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा खो-खो स्पर्धा २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या पुरुष व महिला संघांनी उत्कृष्ट कामगिरी करत दोन्ही गटांमध्ये सुवर्णपदक पटकावून महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला.

महिला संघाने साखळी फेरीत आरएसबी चंदीगड, दिल्ली सचिवालय, एनसीटी दिल्ली व पुदुचेरी या संघांवर दमदार विजय मिळवून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. उपांत्यपूर्व फेरीत आरएसबी चेन्नई संघाचा पराभव करून महिला संघाने उपांत्य फेरी गाठली. उपांत्य फेरीत ओडिशा संघावर मात करत अंतिम फेरीत प्रवेश केला. अंतिम सामन्यात बलाढ्य हरियाणा संघाचा पराभव करून महाराष्ट्राच्या महिला संघाने सुवर्णपदकावर नाव कोरले.

पुरुष संघाने देखील संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण व दर्जेदार खेळाचे प्रदर्शन करत अंतिम फेरीपर्यंत मजल मारली. अत्यंत चुरशीने खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात गतविजेते आरएसबी मुंबई संघावर मात करून महाराष्ट्राच्या पुरुष संघाने सुवर्णपदक प्राप्त केले. अशा प्रकारे महाराष्ट्राच्या पुरुष व महिला संघांनी दुहेरी सुवर्णपदक मिळवत स्पर्धेवर आपला ठसा उमटविला.

**पुरुष संघातील खेळाडू :** अनिकेत पोटे, अविनाश देसाई, नरेश सावंत, आनंता साळवे, आकाश वाघमारे, सुशांत कलढोणे, उमेश सातपुते, सुयश गरगटे, सचिन पालकर, फैजाखाँ पठाण, अक्षय भांगरे, निखिल मस्के, मिलिंद कुरपे, प्रमोद तेली व सुनील वाघमारे.

प्रशिक्षक : श्री. संतोष वाबळे

व्यवस्थापक : श्री. अनिकेत काळे

**महिला संघातील खेळाडू :** प्रियंका भोपी, प्रीती काळे, श्वेता गवळी, प्रियंका इंगळे, किरण शिंदे, अपेक्षा सुतार, ऋतुजा खरे, रेश्मा राठोड, ऐश्वर्या ढोके, ऐश्वर्या सावंत, गौरी शिंदे, कविता घाणेकर, संपदा मोरे, जानवी पेठे व निकिता पवार.

प्रशिक्षक : श्रीमती मनीषा मानकर

व्यवस्थापक : श्रीमती प्रियंका येळे

संघातील कु. संपदा मोरे हिला सर्वोत्कृष्ट आक्रमणपटू, कु. प्रियंका इंगळे हिला सर्वोत्कृष्ट अष्टपैलू, श्री. अक्षय भांगरे यांना सर्वोत्कृष्ट बचावपटू, कु. फैजाखाँ पठाण यांना सर्वोत्कृष्ट अष्टपैलू पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

## अखिल भारतीय नागरी सेवा क्रिकेट स्पर्धा २०२५-२६

दिनांक १७ ते २६ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत नवी दिल्ली येथे अखिल भारतीय नागरी सेवा क्रिकेट स्पर्धा २०२५-२६ आयोजित करण्यात आली होती.

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्य संघाचा पहिल्या फेरीतील सामना राजस्थान राज्य संघाविरुद्ध झाला. या सामन्यात महाराष्ट्र संघाला पराभव स्वीकारावा लागला. राजस्थान संघाने हा सामना जिंकत स्पर्धेत उपविजेतेपदही पटकावले.

महाराष्ट्र संघातर्फे गोलंदाजीमध्ये श्री. सरदार शेख यांनी उत्कृष्ट कामगिरी करत ३ विकेट्स घेतल्या. फलंदाजीमध्ये श्री. महेश मुंडे यांनी ४९ चेंडूत ७४ धावांची झुंजार खेळी साकारली, तर श्री. पवन फड यांनी ३३ चेंडूत ४१ धावांचे मोलाचे योगदान दिले.

या सामन्यात महाराष्ट्र संघाच्या अंतिम ११ खेळाडूंमध्ये सर्वश्री. महेश मुंडे, पवन फड, सरदार शेख, कुणाल पाटील, श्रीकांत सोनावणे, रोहन शेटये, संदीप खरात, मनीष धनु, संजय राठोड, चंदन सोनी आणि विशाल तुप्पड यांचा समावेश होता.

संघाचे फलंदाज प्रशिक्षक म्हणून श्री. योगेश्वर मोरे, गोलंदाजी प्रशिक्षक म्हणून श्री. हेमंतकुमार घोलप यांनी तर व्यवस्थापक म्हणून श्री. दिलदार शेख यांनी जबाबदारी सांभाळली.

## आंतर कार्यालयीन क्रिकेट स्पर्धा २०२५-२६

सचिवालय जिमखान्याच्या सभासदांकरिता (महिला व पुरूष) आंतर कार्यालयीन टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा दिनांक ६ ते ८ एप्रिल, २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत एकूण २५ पुरूष व ६ महिला संघ सहभागी झाले होते. सदर स्पर्धेतील बहुतेक सामने अटीतटीचे झाले. सदर स्पर्धेचा निकाल खालीलप्रमाणे आहेत :-

**विजेता संघ (पुरुष) सर ज. जी. समूह रुग्णालय, मुंबई.**

**उपविजेता संघ (पुरुष) – महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.**

**उत्कृष्ट फलंदाज श्री. जगदीश वाघेला आणि उत्कृष्ट गोलंदाज श्री. अमोल दरेकर, सर ज.जी. समूह रुग्णालय, मुंबई.**

**विजेता संघ (महिला) – नियंत्रक शिधावाटप कार्यालय**

**उपविजेता संघ (महिला) – गृह विभाग व सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई**

**उत्कृष्ट फलंदाज श्रीमती अफसाना जमादार व उत्कृष्ट गोलंदाज श्रीमती ज्योती वराळे, नियंत्रक शिधावाटप**

स्पर्धेचे नियोजन, व्यवस्थापन व आयोजन अत्यंत उत्कृष्टरित्या पार पडले, या बद्दल सर्व संघानी क्रिकेट सचिव तसेच सचिवालय जिमखाना कार्यकारिणीचे मन:पूर्वक आभार व्यक्त केले.

## टाईम्स शिल्ड क्रिकेट स्पर्धा २०२५-२६

सचिवालय जिमखाना क्रिकेट संघ टाईम्स शिल्ड स्पर्धेत याहीवर्षी सहभागी झाला होता. या स्पर्धेच्या पहिल्या फेरीत नामांकित माझगाव डॉक संघाविरुध्द होता. हा सामना चुरशीचा झाला, परंतु शेवटच्या क्षणी माझगाव संघाने आपल्यावर मात केली.

या सामन्यात श्री. फिरोझ खान यांनी ३० धावा आणि श्री. श्रीकांत सोनावणे व श्री. संजय राठोड यांनी प्रत्येकी २ गडी बाद केले.

## अखिल भारतीय नागरी सेवा टेबल टेनिस स्पर्धा २०२५-२६

दिनांक १२ ते १६ जानेवारी, २०२६ या कालावधीत चंदीगड येथे अखिल भारतीय नागरी सेवा टेबल टेनिस स्पर्धा २०२५-२६ आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत महाराष्ट्र शासनाच्या संघात सर्वश्री श्री.प्रेमजीत रणनवरे, तेजस कांबळे, नितीन डोळस, ओंकार भंडारी, विनायक साखरे, सुहास घस्ती, राजेंद्र आंधळे, स्नेहल भोळे, एकता घाडगे, शुभांगी जुनघरे, शुभांगी तुम्मे, राधिका गुप्ता आणि पल्लवी ठणके यांची निवड झाली होती. तसेच प्रशिक्षक म्हणून श्री. सोपान आरोटे व व्यवस्थापक म्हणून श्री. विजय महाजन यांची नियुक्ती करण्यात आली होती.

सदर स्पर्धेत महिलांच्या वयस्क गटामध्ये श्रीमती स्नेहल भोळे यांनी रौप्य पदकाची कमाई केली.

तसेच महिलांच्या वयस्क दुहेरी गटामध्ये श्रीमती स्नेहल भोळे आणि शुभांगी जुनघरे या जोडीने कांस्य पदक प्राप्त केले.

संघातील उर्वरित खेळाडूंनीदेखील आपापल्या परीने चांगला खेळ करण्याचा प्रयत्न केला. एकूण संपूर्ण स्पर्धेत महाराष्ट्राच्या संघाची कामगिरी उत्तम राहिली.

## अखिल भारतीय नागरी सेवा कॅरम स्पर्धा २०२५-२६

दिनांक १७ ते २४ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत केंद्र शासनाच्या वतीने त्यागराज स्टेडियम, नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा स्पर्धा कॅरम २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र शासनाचा कॅरम संघ सहभागी झाला होता. सदर पुरुष संघात सर्वश्री गोपाळ कानडे, राहूल बर्वे, आयुष पुगावकर, अर्जुना के.आर. प्रफुल्ल चिंचे, जयवंत मोरे, विद्याधर पाटसकर, शैलेश पाटील हे खेळाडू तर महिला संघात श्रीमती अलिशा वेंगुर्लेकर, शमा कदम, कविता देशपांडे, अश्विनी अ. बोरगे, पूजा होटकर, पृथ्वी साळवे हे खेळाडू सहभागी झाले होते. तसेच संघाचे प्रशिक्षक श्री.उदय शिंदे आणि व्यवस्थापक श्री. राजेंद्र कांबळे यांनी खेळाडूंना प्रोत्साहनपर मार्गदर्शन केले.

स्पर्धेत संघातील खेळाडूंनी चांगल्या खेळाचे प्रदर्शन केले. परंतु त्यांना अपेक्षित यश प्राप्त करता आले नाही. एकंदरीत सर्व सहभागी खेळाडूंची कामगिरी चांगली झाली.

## आंतर कार्यालयीन कॅरम स्पर्धा २०२५-२६

सन २०२५-२६ या वर्षात सचिवालय जिमखाना सभासदांकरीता दिनांक २७ एप्रिल, २०२६ रोजी कॅरम स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेतील विजेते खेळाडू खालीलप्रमाणे.

| कॅरम | प्रथम क्रमांक | व्दितीय क्रमांक |
|---|---|---|
| **महिला गट** | श्रीमती अलिशा वेंगुर्लेकर | श्रीमती कविता देशपांडे |
| **पुरुष गट** | श्री. आयुष पुगांवकर | श्री. विजय दळवी |
| **पुरुष वयस्क गट** | श्री. जयवंत मोरे | श्री. संजय वारंग |

मंडपेश्वर सिव्हिक फेडरेशन, बोरिवली, मुंबई तर्फे दिनांक १८ ते २० एप्रिल, २०२५ या कालावधीत १० वी मंडपेश्वर राज्य मानांकन कॅरम स्पर्धा २०२५ चे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत सचिवालय जिमखान्याचे सभासद श्री. जयवंत मोरे आणि श्री. आशिष कुंभारे हे सभासद सहभागी झाले होते.

## अखिल भारतीय नागरी सेवा बॅडमिंटन स्पर्धा २०२५-२६

अखिल भारतीय नागरी सेवा बॅडमिंटन स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन गोवा शासनाच्या वतीने दयानंद बांदोडकर क्रीडा संकुल, पेडेम, मापुसा, गोवा येथे दिनांक १५ फेब्रुवारी ते २१ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत करण्यात आले होते. सदर स्पर्धेत महाराष्ट्र राज्याचा बॅडमिंटन संघ सहभागी झाला होता.

महाराष्ट्र राज्याचा बॅडमिंटन संघात खालील खेळाडूंचा समावेश होता.

**पुरुष गट**

सर्वश्री नितीन गायकवाड, प्रविण मुंढे, डॉ. निलेश पाचबुद्धे, सदाशिव साळुंखे, शशिकांत भिसे, प्रज्वल पाथरे, पंकज राठोड, सुदाम तांदळे, रितेश अनंतवार, मनीष चिखलकर, प्रशांतकुमार बोरकर, रोहित मोहोड, राहुल कांबळे, ओंकार लोखंडे, दिपक रोंगे.

**महिला गट**

डॉ. ज्योती वानखडे, श्रध्दा मगर, रेश्मा चव्हाण, ऋचा आळवेकर, प्रज्ञा पवार, प्रतिक्षा मुंढे, श्रीमती फरोग मुकादम, प्रिया हळदवणेकर,

प्रशिक्षक : श्री. सागर एस. तायडे व्यवस्थापक : श्री. माधव खैरे

सदर स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या खेळाडूंनी पुढीलप्रमाणे चांगली कामगिरी केली.

| उपांत्यपूर्व फेरी | गट | खेळाडू |
|---|---|---|
| | पुरुष एकेरी ५० + | श्री. शशिकांत भिसे |
| | महिला एकेरी ४५ + | डॉ. ज्योती वानखडे |
| | महिला दुहेरी खुला गट | श्रीमती श्रध्दा मगर + कु. ऋचा आळवेकर |
| | महिला दुहेरी खुला गट | कु. प्रतिक्षा मुंढे + श्रीमती प्रज्ञा पवार |
| उप उपांत्यपूर्व फेरी | महिला एकेरी खुला गट | कु. ऋचा आळवेकर |
| | | कु. प्रतिक्षा मुंढे |
| | | श्रीमती प्रज्ञा पवार |
| | मिश्र दुहेरी खुला गट | कु. ऋचा आळवेकर + श्री. रितेश अनंतवार |
| | मिश्र दुहेरी ४५ + गट | डॉ. ज्योती वानखडे + डॉ. निलेश पाचबुद्धे |
| ३ री फेरी | पुरुष दुहेरी ४०+ गट | श्री. प्रविण मुंढे + श्री. पंकज राठोड |
| | | श्री. सुदाम तांदळे + डॉ. निलेश पाचबुद्धे |
| | पुरुष दुहेरी ५०+ गट | श्री. मनीष चिखलकर + श्री. प्रशांत बोरकर |

## आंतर कार्यालयीन बॅडमिंटन स्पर्धा २०२५-२६

सचिवालय जिमखाना सभासदांकरीता आंतर कार्यालयीन क्रीडा व कला स्पर्धा अंतर्गत दिनांक २० ते २२ एप्रिल, २०२६ या कालावधीत बॅडमिंटन स्पर्धा २०२५-२६ आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेला सभासदांचा भरघोस प्रतिसाद लाभला. स्पर्धेतील विजेते खेळाडू खालीलप्रमाणे :-

| स्पर्धा प्रकार व गट | प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक |
|---|---|---|
| पुरुष एकेरी खुला गट | श्री. ज्ञानेश्वर आव्हाड | श्री. शशिकांत भिसे |
| पुरुष एकेरी ४० + गट | श्री. प्रविण मुंढे | श्री. शशिकांत भिसे |
| महिला एकेरी खुला गट | कु. ऋचा आवळेकर | श्रीमती श्रध्दा मगर |
| पुरुष दुहेरी खुला गट | श्री. सुरेश नाईक + श्री. मयंक केळकर | श्री. सदाशिव साळुंके + श्री. संकेत शिंदे |
| पुरुष दुहेरी ८० + गट | श्री. शशिकांत भिसे + श्री. सदाशिव साळुंके | श्री. नितीन क्षीरसागर + श्री. ज्ञानेश्वर आव्हाड |
| मिश्र दुहेरी | श्री. सदाशिव साळुंके + श्रीमती श्रध्दा मगर | श्री. प्रविण मुंढे + कु. ऋचा आवळेकर |

## अखिल भारतीय नागरी सेवा लॉन टेनिस स्पर्धा २०२५-२६

### महाराष्ट्र संघाची ऐतिहासिक कामगिरी !

अखिल भारतीय नागरी सेवा लॉन टेनिस स्पर्धा २०२५-२६ सचिवालय जिमखाना, सेक्टर-२१, गांधीनगर, गुजरात मध्ये दिनांक १६ ते २२ डिसेंबर, २०२५ या कालावधीत पार पडली. महाराष्ट्र राज्याच्या संघाने अतिशय दिमाखात सहभाग नोंदवला. गुजरात येथे झालेल्या या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत आपल्या संघाने २ सुवर्ण पदके प्राप्त करुन महाराष्ट्राच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

### श्रीमती संध्याराणी बंडगर यांची सुवर्णमयी कामगिरी !

महाराष्ट्र संघातील अग्रगण्य महिला खेळाडू श्रीमती संध्याराणी बंडगर यांनी गतवर्षासारखीच आपली विजयाची परंपरा कायम ठेवत यंदाही मैदानावर एकहाती वर्चस्व गाजवले. त्यांनी आपल्या दर्जेदार खेळाचे उत्कृष्ट प्रदर्शन करत खालील दोन सर्वोच्च बहुमान पटकावले:

**महिला एकेरी** (Women's Singles) – **सुवर्ण पदक**

**महिला दुहेरी** (Women's Singles) – **सुवर्ण पदक**

त्यांच्या या अष्टपैलू आणि उत्कृष्ट खेळामुळे त्यांनी मैदानावर उपस्थित सर्व क्रीडाप्रेमींची व  क्रीडा रसिकांची  मने जिंकली आणि महाराष्ट्र राज्याचे नाव राष्ट्रीय पातळीवर पुन्हा एकदा उंचावले

**लॉन टेनिस संघामध्ये खालील स्पर्धक सहभागी झाले होते.**

| | |
|---|---|
| श्री. किरण सोनवणे (कर्णधार) | श्री. कुशाग्र पाठक |
| श्री. उदय माने | श्री. सुधीर कुंभार |
| श्री. राजीव गरकल | श्री. प्रतीक हरीमकर |
| श्री. अमोल वाणी | श्रीमती संध्याराणी बंडगर (महिला) |
| श्री. प्रशांत मेंगळ, (व्यवस्थापक) | श्री. जुगल जाधव (प्रशिक्षक) |

श्रीमती संध्याराणी बंडगर यांची पोर्तुगाल येथे दिनांक २ ऑगस्ट २०२६ ते ७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत होणाऱ्या २०२६ (ITF World Tennis Master Tour Team Championships) साठी भारतीय संघात निवड झाली असून. श्रीमती बंडगर यांची संघाच्या कर्णधारपदी निवृती करण्यात आली आहे. सचिवालय जिमखान्याच्यावतीने श्रीमती बंड़गर यांचे अभिनंदन व हार्दिक शुभेच्छा.

## अखिल भारतीय नागरी सेवा कबड्डी स्पर्धा, २०२५-२६

कबड्डी ग्राऊंड, स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, सेक्टर-४२, चंदिगड येथे दिनांक ९ ते १४ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत अखिल भारतीय नागरी सेवा कबड्डी स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या पुरुष व महिला संघाने सहभाग नोंदविला होता.

**पुरुष संघ :**

महाराष्ट्र राज्याच्या पुरुष संघाचा पहिला सामना हरयाणा सेक्रेटरीयट संघाबरोबर झाला. या सामन्यात महाराष्ट्र राज्याच्या संघाने (४३-२६) १७ गुणाने पहिला विजय प्राप्त केला. दुसरा सामना महाराष्ट्र विरुध्द उत्तराखंड सेक्रेटरीयट (३९-१४) २५ गुणाने महाराष्ट्र राज्याने दुसरा विजय प्राप्त केला. महाराष्ट्र विरुध्द अपराजित अशा सेंट्रल सेक्रेटरीयट दिल्ली संघाबरोबर रंजक सामन्यात महाराष्ट्र राज्याच्या (४०-३४) ६ गुणाने दणदणीत विजय प्राप्त केला. सर्वश्री गिरीश इरनाक व आकाश शिदें या छत्रपती पुरस्कार विजेत्या खेळाडूंनी विजयामध्ये महत्वाची भूमिका बजावली. महाराष्ट्र विरुध्द आर.एस.बी. बेंगळुरु संघाबरोबर अटीतटीच्या सामन्यात (३७-४९) १२ गुणांनी महाराष्ट्र राज्याच्या संघाला हार पत्कारावी लागली. महाराष्ट्र राज्याच्या संघात श्री. गिरीश इरनाक (कर्णधार) श्री. आकाश शिंदे हे शिवछत्रपती पुरस्कार विजेते तसेच आंतर राष्ट्रीय खेळाडू सहभागी झाले होते. त्यांनी अप्रतिम खेळ करुनही पुरुषांचा संघ उपउपांत्य फेरी गाठू शकला नाही. संघातील इतर खेळाडू सर्वश्री निवृत्ती जगताप, संकेत कावरे, विश्वास खंदारे, शुभम मोठे, आकाश शिंदे, सुरज कांबळे, सुरेंद्रसिंग मेहरा, विक्रम कदम, गोरख पवार, अंकुश महाले, गणेश काळे, विशाल कोटमे, निलेश चिंदरकर यांनी ही उत्तम खेळाचे प्रदर्शन केले.

**महिला संघ :**

महिला संघास पहिला सामना महाराष्ट्र विरुध्द केरळ (२७-०२) महाराष्ट्र राज्याचा २ गुणाने विजय, दुसरा सामना महाराष्ट्र विरुध्द पंजाब (१९-२९) महाराष्ट्र राज्याच्या संघाला पराभव पत्कारावा लागला. तीसरा सामना महाराष्ट्र विरुध्द कर्नाटक संघाबरोबर (३१-०३) २८ गुणांनी महाराष्ट्र राज्याचा संघ विजयी झाला. चौथ्या सामन्यात महाराष्ट्र विरुध्द बिहार (३५-४५) अशा १० गुणांनी महाराष्ट्र राज्याला हार पत्करावी लागली. दिल्ली संघाबरोबर अटीतटीच्या सामन्यात महाराष्ट्र राज्याच्या संघाने (२८-१५) १३ गुणांनी विजय मिळविला. महाराष्ट्राच्या संघातून सर्वश्रीमती सायली जाधव (कर्णधार), सायली केरीपाळे, ऋतूजा कडलगे, प्रिती करवा, अप्सरा पवार, सारीका क्षिरसागर, स्वाती गायकवाड, सुचिता सेलूकर, माधवी राऊत, ऐश्वर्या सुर्वे, जयश्री सो. साठे, अस्मिता माळी, वैशाली खरमाळे, ज्योती राक्षे या महिला खेळाडूंनी संघासाठी अथक प्रयत्नाची शिकस्त केली. मात्र, संघास अपेक्षित यश मिळू शकले नाही. एकंदरीत संघाची कामगिरी उत्तम झाली.

पुरुष संघाचे श्री. संतोष जाधव (प्रशिक्षक) आणि श्री. जयवंत शेटे (व्यवस्थापक) तसेच महिला संघाचे श्री. आनंदा हेगडे (प्रशिक्षक) आणि श्री. गणेश भोईर (व्यवस्थापक) यांनी संघातील सर्व पुरुष/महिला खेळाडूंना चांगल्या खेळासाठी सातत्याने प्रोत्साहित केले. सर्व खेळाडूंची स्पर्धेतील कामगिरी अत्यंत चांगली झाली.

## अखिल भारतीय नागरी सेवा हॉकी स्पर्धा (महिला) २०२५-२६

अखिल भारतीय नागरी सेवा हॉकी स्पर्धा (महिला) नवी दिल्ली येथे दिनांक १७ ते २८ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत खेळविण्यात आल्या. या स्पर्धेत एकूण ११ संघांनी सहभाग नोंदवला. यावर्षी महाराष्ट्राच्या महिला संघाने प्रथमच सहभाग नोंदविला. स्पर्धेतील पहिला सामना बलाढ्य ओडिसा संघाविरुध्द होता. या सामन्यात महाराष्ट्र राज्याच्या महिला संघाला ११-० गोल्सने पराभव पत्कारावा लागला.

स्पर्धेतील दुसरा सामना कर्नाटक संघाविरुध्द खेळविण्यात आला. या सामन्यात मात्र महिला संघाने दमदार कामगिरी बजावत ८-१ गोल्सनी दणदणीत विजय मिळवला. या सामन्यात महाराष्ट्राच्या संघाकडून पूजा शिंदे-४, आरती हळींगळी -१, अश्विनी जाधव -१, वैशाली सूळ-१, शरयू शिवणकर -१ यांनी गोल्स नोंदविले.

स्पर्धेतील तिसरा सामना राजस्थान संघाविरुध्द खेळविण्यात आला. या ही सामन्यात महिला संघाने उत्कृष्ट कामगिरी बजावत ६-१ गोल्सनी विजय मिळवला. या सामन्यात महाराष्ट्राच्या संघाकडून आरती हळींगळी -३, पूजा शिंदे -१, वैशाळी सूळ -१, शरयू शिवणकर -१ यांनी गोल्स नोंदविले.

स्पर्धेतील चौथा सामना बलाढ्य हरियाणा विरुध्द खेळविण्यात आला. या सामन्यात चांगली लढत देण्याचा प्रयत्न महाराष्ट्र संघाने केला, परंतु या सामन्यात संघाला २-६ गोल्सने पराभव स्विकारावा लागला. या सामन्यात महाराष्ट्र संघाकडून पूजा शिंदे -१, वैशाळी सूळ - १, यांनी गोल्स नोंदविले.

स्पर्धेतील शेवटचा सामना बिहार संघाविरुध्द खेळविण्यात आला. या सामन्यात ही महाराष्ट्राच्या संघाने दमदार कामगिरी करत, ४-१ गोल्सने विजय मिळवत स्पर्धेची विजयी सांगता केली. या सामन्यात महाराष्ट्र संघाकडून शरयू शिवणकर -१, पल्लवी -१, आरती हळींगळी -२, असे गोल्स नोंदविले. एकंदरीतच महाराष्ट्राच्या महिला संघाने पहिल्याच प्रयत्नात चांगली कामगिरी करताना ५ पैकी ३ सामने चांगल्या गोल फरकाने जिंकले. महिला संघासाठी प्रशिक्षक म्हणून श्रीमती वैशाली सूळ व व्यवस्थापक म्हणून श्री. विजय परब यांनी चांगली कामगिरी करताना, संघातील सर्व महिला खेळाडूंना चांगल्या खेळासाठी सातत्याने प्रोत्साहित केले.

शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित, आंतरराष्ट्रीय खेळाडू श्री. धनंजय महाडिक व हॉकी सचिव श्री. मकरंद गयावळ यांनी पुरुष/ महिला हॉकी संघाला बहुमोल मार्गदर्शन केले.

**अखिल भारतीय नागरी सेवा हॉकी स्पर्धा (पुरुष) २०२५-२६**

अखिल भारतीय नागरी सेवा हॉकी स्पर्धा (पुरुष) नवी दिल्ली येथे दिनांक १७ ते २८ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत खेळविण्यात आल्या. या स्पर्धेत एकूण ३४ संघांनी सहभाग घेतला होता.

पुरुष गटाचा पहिला सामना कनार्टक संघाबरोबर झाला. त्या सामन्यात महाराष्ट्राच्या संघाने ७-० गोलने दणदणीत विजय मिळविला. या सामन्यात महाराष्ट्र राज्याच्या पुरुष संघातील श्री. अझर शेख -१, श्री. निफाज शेख - १, श्री. असिफ पठान -१, श्री.संतोष बिराजदार - १, श्री. विनोद शिंगाडे - १, आणि श्री. भगवान पवार -२ असे गोल नोंदविले.

स्पर्धेतील दुसरा सामना उत्तर प्रदेश संघाबरोबर झाला. या सामन्यात पुरुष संघाला १-४ गोल्सने पराभव पत्करावा लागला. या सामन्यात महाराष्ट्राच्या संघाकडून श्री. निफाज शेख यांनी एकमेव गोल नोंदविला.

स्पर्धेतील तिसरा सामना बलाढ्य हरियाणा संघाविरुध्द खेळविण्यात आला. या स्पर्धेत संघाची निराशाजनक कामगिरी झाली व हा सामना १-१० इतक्या गोल फरकाने गमवावा लागला. या सामन्यात श्री. संतोष बिराजदार यांनी एकमेव गोल केला.

स्पर्धेतील शेवटचा सामना ओडिशा संघाबरोबर खेळविण्यात आला. सदर स्पर्धेत संघाने चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न केला, अटीतटीच्या सामन्यात ओडिशा संघाने ३-२ असा निसटता विजय मिळवला. या सामन्यात महाराष्ट्र संघाकडून श्री. विनोद शिंगाडे – १ आणि श्री. कुणाल भट -१ असे गोल्स नोंदविले.

एकंदरीतच महाराष्ट्राच्या पुरुष संघाने स्पर्धेत ४ पैकी २ सामने जिंकत चांगली कामगिरी नोंदविली. पुरुष संघाचे व्यवस्थापक म्हणून श्री. विजय शेटे यांनी व प्रशिक्षक म्हणून श्री. दिनेश मळेकर यांनी उत्कृष्ट कामगिरी बजावत संघातील सर्व खेळाडूंना चांगल्या कामगिरीसाठी सातत्याने प्रोत्साहित केले.

## अखिल भारतीय नागरी सेवा कुस्ती स्पर्धा २०२५-२६

दिनांक २६ ते २८ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत मंडी, हिमाचल प्रदेश येथे झालेल्या अखिल भारतीय नागरी सेवा कुस्ती स्पर्धा २०२५-२६ मध्ये महाराष्ट्र राज्याच्या कुस्ती संघातील खेळाडूंनी दोन सुवर्ण व पाच कांस्य अशी एकूण ७ पदके प्राप्त केली आहेत.

| | | |
|---|---|---|
| श्रीमती साक्षी इंगळे | ६ २ किलो फ्रीस्टाइल | सुवर्ण पदक |
| श्रीमती कोमल गोळे | ७ २ किलो फ्रीस्टाइल | सुवर्ण पदक |
| श्रीमती नमिता कांबळे | ५ ३ किलो फ्रीस्टाइल | कांस्य पदक |
| श्री.भरतरीनाथ गोफने | ७४ किलो फ्रीस्टाइल | कांस्य पदक |
| श्रीमती मनिषा दिवेकर | ७ ६ किलो फ्रीस्टाइल | कांस्य पदक |
| श्री. विजय नरळे | ८ २ किलो फ्रीस्टाइल | कांस्य पदक |
| श्री. मोहित पाटील | ९ ७ किलो ग्रीको रोमन | कांस्य पदक |

महिला गटाला उपरोक्त कामगिरीमुळे तिसऱ्या क्रमांकाची टिम चॅम्पियनशिप मिळाली. कुस्ती संघातील इतर सर्व कुस्तीपटूंनी उत्तम कामगिरी केली. फ्री स्टाईल क्रीडा प्रकारांत सर्वश्री विलास वाघमारे, गोविंद बडे, सुभाष ढोणे, अनिकेत चव्हाण, भरतरीनाथ गोफणे, अमर संकपाळ, ओंकार चौगले, समर्थ पाटील, अरुण पाटील, हनुमंत खरात सहभागी झाले होते.

ग्रीको रोमण पुरुष संघात सर्वश्री धनंजय महाडिक, सुभाष पाडेकर, केदारनाथ पाटील, महेश घुले, संदीप मांडवेकर, विजय नरळे, पांडुरंग पाटील, मोहित पाटील, अजय डंगोरे

फ्री स्टाईल महिला क्रीडा प्रकारांत सर्वश्रीमती प्रियंका गिरे, कु. नमिता कांबळे साक्षी इंगळे, गितांजली काळे, निर्जला मोघाडे, पूजा कांबळे, मनिषा ऱ्हायकर, प्रियांका येरुडकर, कोमल गोळे, मनिषा दिवेकर सहभागी झाल्या होत्या. महाराष्ट्र राज्याच्या कुस्ती संघाचे प्रशिक्षक श्री. नईम फिरोज शेख यांनी खेळाडूंना उत्तम मार्गदर्शन केले.

**श्रीमती कोमल गोळे यांची विशेष कामगिरी**

दिनांक २३ ते २७ मे २०२६ या कालावधीत व्हिएतनाम येथे आयोजित सिनियर आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत (Senior Asian Wrestling Championships) भारतीय महिला कुस्ती संघाच्या प्रशिक्षक (Coach) म्हणून यशस्वीपणे जबाबदारी पार पाडली. सदर स्पर्धेत भारतीय महिला संघाने सांघिक विजेतेपद संपादन केले. या उल्लेखनीय यशाबद्दल भारताच्या माननीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या अधिकृत X ( Twitter, Facebook, instagram) माध्यमातून भारतीय संघाचे विशेष अभिनंदन व कौतुक केले.

ऑक्टोबर २०२६ मध्ये जपान येथे आयोजित होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धा (Asian Games 2026) करिता भारतीय महिला कुस्ती संघाच्या प्रशिक्षक म्हणून निवड करण्यात आली आहे. त्यानिमित्त सध्या भारतीय क्रीडा प्राधिकरण (SAI), नवी दिल्ली येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय प्रशिक्षण शिबिरात (National Coaching Camp) भारतीय महिला कुस्ती संघास प्रशिक्षण देण्याची जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडत आहेत.

खेळाडू म्हणून सप्टेंबर २०१९ मध्ये आयोजित वरिष्ठ जागतिक कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत (Senior World Wrestling Championships) भारताचे प्रतिनिधित्व करून आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

## अखिल भारतीय नागरी सेवा वेटलिफ्टिंग व पॉवरलिफ्टिंग स्पर्धा २०२५-२६

केंद्र शासनाच्या वतीने चंदीगड येथे दिनांक ५ मार्च २०२६ ते १० मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय नागरी सेवा वेटलिफ्टिंग व पॉवरलिफ्टिंग स्पर्धा २०२५-२६ या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता.

या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र राज्यातील खेळाडूंनी अतिउत्कृष्ट कामगिरी करुन खालीलप्रमाणे पदके व सांघिक विजेतेपद मिळवले आहे.

| **वेटलिफ्टिंग स्पर्धा –** | | |
|---|---|---|
| श्रीमती काजल भाकरे | ४८ किलो | सुवर्ण पदक |
| श्रीमती हर्षदा गरुड | ५३ किलो | सुवर्ण पदक |
| श्री. संकेत सरगर | ६५ किलो | सुवर्ण पदक |
| श्रीमती दिक्षा गायकवाड | ६९ किलो | सुवर्ण पदक |
| श्रीमती कोमल वाकळे | ८६ किलो | सुवर्ण पदक |
| श्रीमती श्रुती तरे | ५८ किलो | कांस्य पदक |
| श्रीमती मनीषा सरोदे | ६३ किलो | कांस्य पदक |
| **५ सुवर्ण पदके व २ कांस्य पदके** | | |

| **पॉवरलिफ्टिंग स्पर्धा –** | | |
|---|---|---|
| श्रीमती काजल भाकरे | ४७ किलो | सुवर्ण पदक |
| श्रीमती समृध्दी देवळेकर | ६३ किलो | सुवर्ण पदक |
| श्री. साहील उतेकर | ६६ किलो | सुवर्ण पदक |
| श्री.निलेश गराटे | १०५ किलो | सुवर्ण पदक |
| श्रीमती श्रेया बोर्डवेकर | ८४ किलो | रौप्य पदक |
| **४ सुवर्ण पदके व १ रौप्य पदक** | | |

**महिला वेटलिफ्टिंग विजेतेपद**

बेस्ट विमेन वेटलिफ्टर – हर्षदा गरुड

**पुरुष पॉवरलिफ्टींग उपविजेतेपद**

**वेटलिफ्टिंग - पॉवरलिफ्टिंग संघातील खेळाडूंनी (पुरुष /महिला) अशी एकत्रित ९ सुवर्ण, १ रौप्य पदक व २ कांस्य पदके अशी पदकांची भरघोस लयलूट केली.**

सदर स्पर्धेसाठी पुरुष वेटलिफ्टींग संघासाठी प्रशिक्षक म्हणून श्रीमती मधुरा सिंहासने आणि महिला वेटलिफ्टींग संघासाठी प्रशिक्षक म्हणून श्रीमती उज्वला माने तसेच व्यवस्थापक म्हणून श्रीमती विद्या शिरस यांनी मोलाचे मार्गदर्शन करुन खेळाडूंना प्रोत्साहित केले.

पॉवरलिफ्टींग पुरुष संघासाठी श्री. संदीप आवारी यांनी तसेच पॉवरलिफ्टींग महिला संघासाठी श्रीमती भक्ती आंब्रे यांनी प्रशिक्षक म्हणून व व्यवस्थापक म्हणून श्री. मिलींद प्रभाकर पाध्ये यांनी बहुमोल मार्गदर्शन करुन खेळाडूंना प्रोत्साहन दिले. वेटलिफ्टींग व पॉवरलिफ्टींग संघाना सचिव श्री. मकरंद गयावळ यांनी मार्गदर्शन व सहकार्य केल्यामुळे खेळाडूंचा आत्मविश्वास वाढवला, परिणामी वेटलिफ्टींग व पॉवरलिफ्टींग संघाने सर्वोत्तम कामगिरी बजावली.

**अखिल भारतीय नागरी सेवा शरीरसौष्ठव स्पर्धा २०२५-२६**

दिनांक १७ ते १९ फेब्रुवारी, २०२६ या कालावधीत नवी दिल्ली येथे अखिल भारतीय नागरी सेवा शरीरसौष्ठव स्पर्धा २०२५-२६ आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या शरीरसौष्ठव संघाने सहभाग घेतला होता. सदर स्पर्धेत २४ राज्यातील संघानी सहभाग नोंदवला होता. स्पर्धेतील महाराष्ट्राची कामगिरी चांगली झाली. सदर स्पर्धेसाठी प्रशिक्षक म्हणून श्री. यशवंत ना. तावडे यांनी चांगली कामगिरी पार पाडत संघातील खेळाडूंना चांगल्या कामगिरीकरिता सतत प्रोत्साहन दिले.

## अखिल भारतीय नागरी सेवा ॲथलेटिक्स स्पर्धा २०२५-२६

केंद्र शासनाच्या विद्यमाने, शासनाच्या वतीने दिनांक १३ ते १५ डिसेंबर, २०२५ या कालावधीत अखिल भारतीय नागरी सेवा ॲथलेटिक्स स्पर्धा २०२५-२६ चे पाटलीपुत्र स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, पाटणा येथे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या संघातील खालील खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करुन महाराष्ट्र संघाला नऊ पदके प्राप्त करून दिली :-

| | | |
|---|---|---|
| अजय पठारे | १०० मी. धावणे | सुवर्ण पदक |
| | २०० मी. धावणे | रौप्य पदक |
| साक्षी पवार | ५००० मी. धावणे | रौप्य पदक |
| | १५०० मी. धावणे | रौप्य पदक |
| किसन तडवी | ५००० मी. धावणे | रौप्य पदक |
| | १५०० मी. धावणे | रौप्य पदक |
| प्रतिक पिंगळे | हॅमर थ्रो | रौप्य पदक |
| संतू वार्डे (वयोगट ४०-५०) | १५०० मी. धावणे | रौप्य पदक |
| प्रमोद तांडेल (वयोगट ५०-६०) | ४०० मी. धावणे | कांस्य पदक |

सदर संघात पुरुष खेळाडू सर्वश्री अजय पठारे, वैभव चौधरी, प्रमोद तांडेल, संकेत मसणे, किसन तडवी, पारस पाटील, राहुल पाटील, विकास कासव, सचिन क्षिरसागर, प्रतिक पिंगळे, हरीश पावडे, पवन तिजारे, अमोल अहेर, सुनिल शिंदे, रविंद्र किसवे, संतू वार्डे, गणेश कदम, ज्ञानेश्वर राठोड, जयदीप कामत, हे पुरुष खेळाडू, तसेच सर्वश्रीमती श्रध्दा चौगुले, ऐश्वर्या ढोके, मनिषा मोरे, श्रावणी पवार, गोमती डोये, गिता वाटगुरे, साक्षी पवार, बायजा पावरा, सारीका तासगावे, पल्लवी अरबट, वैजयंती भागवत, स्नेहल चव्हाण, सोनाली शिंदे, नेहा घाडगे, संघाचे प्रशिक्षक- श्री.मनोज उजाळ यांनी आपली जबाबदारी समर्थपणे पार पाडून संघाचे मनोधैर्य वाढवले.

## आंतर कार्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धा २०२५-२६

दिनांक १२ जून, २०२६ रोजी सभासदांकरीता आयोजित करण्यात आलेल्या आंतर कार्यालयीन ॲथलेटिक्स स्पर्धा २०२५-२६ आयोजित करण्यात आली होती. स्पर्धेत खालील सभासद विजेते ठरले.

| **पुरुष खुला गट** | **प्रथम क्रमांक** | **द्वितीय क्रमांक** |
|---|---|---|
| १०० मीटर धावणे | श्री. प्रसाद अहिरे | श्री. निलेश सावंत |
| २०० मीटर धावणे | श्री. प्रसाद अहिरे | श्री. भूषण दुपारे |
| ४०० मीटर धावणे | श्री. प्रमोद तांडेल | श्री. निलेश सावंत |
| गोळा फेक | श्री. रोशन आव्हाड | श्री. ज्ञानेश्वर राठोड |
| थाळी फेक | श्री. रोशन आव्हाड | श्री. ज्ञानेश्वर राठोड |
| भाला फेक | श्री. चेतन चव्हाण | श्री. भूषण दुपारे |
| **महिला खुला गट** | **प्रथम क्रमांक** | **द्वितीय क्रमांक** |
| १०० मीटर धावणे | श्रीमती सारिका मेंढे | श्रीमती आलिशा वेंगुर्लेकर |
| २०० मीटर धावणे | श्रीमती सारिका मेंढे | श्रीमती अनुष्का महाडिक |
| ४०० मीटर धावणे | श्रीमती योगिता देसाई | श्रीमती मंगल नाखवा |
| गोळा फेक | श्रीमती सारिका मेंढे | श्रीमती आलिशा वेंगुर्लेकर |
| थाळी फेक | श्रीमती आलिशा वेंगुर्लेकर | श्रीमती अनुष्का महाडिक |
| **४५ वर्षावरील पुरुष** | **प्रथम क्रमांक** | **द्वितीय क्रमांक** |
| ५० मीटर धावणे | श्री. सुशिल तरे | श्री. अमित देसाई |
| १०० मीटर धावणे | श्री. प्रमोद तांडेल | श्री. अमित देसाई |
| गोळा फेक | श्री. जयदीप कामत | श्री. सुशिल तरे |
| थाळी फेक | श्री. जयदीप कामत | श्री. प्रविण मुंढे |
| भाला फेक | श्री. प्रमोद तांडेल | श्री. जयदीप कामत |
| **४५ वर्षावरील महिला** | **प्रथम क्रमांक** | **द्वितीय क्रमांक** |
| ५० मीटर धावणे | श्रीमती योगिता देसाई | श्रीमती मंगल नाखवा |
| १०० मीटर धावणे | श्रीमती मंगल नाखवा | श्रीमती योगिता देसाई |

## अखिल भारतीय नागरी सेवा संगीत व नृत्य स्पर्धा २०२५-२६

केंद्रीय नागरी सेवा सांस्कृतिक व क्रीडा मंडळ नवी दिल्ली यांच्या वतीने दिनांक २० ते २५ मार्च, २०२६ या कालावधीत नवी दिल्ली येथे अखिल भारतीय नागरी सेवा संगीत व नृत्य स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन करण्यात आले होते. सचिवालय जिमखान्यामार्फत निवड चाचणी आयोजित करुन महाराष्ट्र राज्याचा ४५ कलाकारांचा संघ निवडण्यात आला. संघात सर्वश्री. अमोल मोहोड, वैभवकुमार शिंदे, योगेंद्र केंजळे, रविंद्रकुमार बिरारे, भरत लब्दे, बिपिन धामणस्कर, राहुल पवार, सुनिल इंगळे, शाम हिंगे, तफज्जुल बेग, विश्राम कुलकर्णी, माधव सूर्यवंशी, प्रितेश रावराणे, उमेश कांबळे, सागर ठाकरे, अमोल कांबळे सर्वश्रीमती धनश्री पवार, सारिका धुमाळ, भक्ती सावंत, शेफाली पारधी, वर्षा रोठे, नम्रता चोगले, प्रियांका ठाकरे, सुरभी भांडारकर, प्रणिता सुजी यांचा समावेश होता. या स्पर्धेत भारतातील एकूण २३ संघ व त्यातील ५७६ स्पर्धक सहभागी झाले होते. श्री. भरत लब्दे यांनी संगीत मार्गदर्शक व श्री. दिनेश चोरगे यांनी नृत्य दिग्दर्शक म्हणून काम पाहिले तर श्रीमती सानिका माने यांनी संघ व्यवस्थापक म्हणून काम पाहिले.

या स्पर्धेत महाराष्ट्र सेक्रेटरीएट संघातील कलाकारांनी केलेली उत्कृष्ट कामगिरीखालीलप्रमाणे आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| संगीत | हिंदुस्थानी उपशास्त्रीय संगीत | वैभवकुमार शिंदे | रौप्य पदक |
| | समूह लोकसंगीत | भरत लब्दे, बिपीन धामणस्कर, राहुल पवार, सुनील इंगळे, शाम हिंगे, तफज्जुल बेग, सारिका धुमाळ, भक्ती सावंत | रौप्य पदक |
| वाद्यसंगीत | हिंदुस्थानी शास्त्रीय वाद्यसंगीत | विश्राम कुलकर्णी | कांस्य पदक |
| नृत्य | पाश्चात्य नृत्य | वर्षा रोठे | सुवर्ण पदक |
| | समूह लोकनृत्य | प्रितेश रावराणे, उमेश कांबळे, सागर ठाकरे, अमोल कांबळे, नम्रता चोगले, प्रियांका ठाकरे, सुरभी भांडारकर, प्रणिता सुजी | कांस्य पदक |

महाराष्ट्र सेक्रेटरीएट संघाने ५ सुवर्ण, ३ रौप्य व २ कांस्य अशी एकूण १० पदके मिळवून “टीम चॅम्पियनशीप” मिळवली.

## संगीत विभाग

**(१) पावसाळी गीतांचा कार्यक्रम - दिवाना हुआ बादल**

सचिवालय जिमखाना संगीत विभागातर्फे दिनांक २५ जुलै, २०२५ रोजी “दिवाना हुआ बादल” हा पावसाळी गाण्यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

**(२) स्व. मोहम्मद रफी यांच्या १०१ व्या वाढदिवसानिमित्त - दिल ने फिर याद किया**

दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी “दिल ने फिर याद किया” हा स्व. मोहम्मद रफी यांच्या १०१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या गाण्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला.

**(३) हार्मोनियम प्रशिक्षण वर्ग -**

सचिवालय जिमखाना संगीत विभागातर्फे दिनांक १ जानेवारी २०२६ पासून सभासदांसाठी आठवड्यातून दोन दिवस (सोमवार व गुरुवार) दुपारी १.०० ते २.३० या वेळेत हार्मोनियम प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आलेले आहेत. हे प्रशिक्षण वर्ग नि:शुल्क असून या वर्गाला श्री. भरत लब्दे मार्गदर्शन करतात.

**(४) अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय शास्त्रीय संगीत परीक्षा**

सचिवालय जिमखाना संगीत विभागातर्फे अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय शास्त्रीय संगीत परीक्षेस बसलेल्या प्रशिक्षणार्थींचा निकाल खालीलप्रमाणे आहे :-

| प्रशिक्षणार्थींची नावे | परिक्षा | वर्ष | श्रेणी |
|---|---|---|---|
| सुबोध आंबवकर | प्रारंभिक | एप्रिल २०२५ | प्रथम श्रेणी |
| वैशाली दिगे | प्रवेशिका प्रथम | एप्रिल २०२५ | द्वितीय श्रेणी |
| अपर्णा जाधव | मध्यमा पूर्ण | नोव्हेंबर २०२५ | द्वितीय श्रेणी |
| शिल्पा मुंदाणे | प्रवेशिका पूर्ण | नोव्हेंबर २०२५ | द्वितीय श्रेणी |

**(५) आंतरकार्यालयीन संगीत स्पर्धा २०२५-२६**

सचिवालय जिमखाना संगीत विभागाकडून दिनांक १६ व १७ फेब्रुवारी, २०२५ रोजी आंतरकार्यालयीन शास्त्रीय संगीत, नाट्य संगीत, वाद्यसंगीत व सुगम संगीत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विजयी झालेले कलाकार खालीलप्रमाणे :-

**शास्त्रीय संगीत**

| पुरुष | महिला |
|---|---|
| प्रथम - अजित बाविस्कर | प्रथम - कनिका जाधव |
| द्वितीय - योगेंद्र केंजळे | द्वितीय - अपर्णा जाधव |

## नाटयसंगीत

**पुरुष**

प्रथम - अजित बाविस्कर

द्वितीय - योगेंद्र केंजळे

**महिला**

प्रथम - श्रद्धा कुडवळकर

द्वितीय - कलिका गानू

## वाद्यसंगीत

**पुरुष**

प्रथम - बिपिन धामणस्कर

द्वितीय - योगेंद्र केंजळे

## सुगम संगीत

**एकल गीत**

| **पुरुष (५० )** | **पुरुष (५०-)** |
|---|---|
| प्रथम - बाळासाहेब सावंत | प्रथम - विकास गव्हांदे |
| द्वितीय - तफज्जुल बेग | द्वितीय - अजय सावद |
| **महिला (५० )** | **महिला (५०-)** |
| प्रथम - कलिका गानू | प्रथम - निलिमा काकुळते |
| द्वितीय - उषा धनू | द्वितीय - सारीका धुमाळ |

## युगुल गीत

**प्रथम -** समीर पालकर, अजय सावद

**द्वितीय -** निलिमा काकुळते, उषा धनू

## समुह गीत

**प्रथम -** अजित बाविस्कर, ज्ञानेश पाटमासे, भरत लब्दे, नलिनी तालणकर, अपर्णा जाधव, कनिका जाधव, नीता कुरणे

**द्वितीय -** तफज्जुल बेग, सुनील इंगळे, उषा धनू, प्रणिता तांबे, अनुष्का गावडे

## नृत्य विभाग

### (१) मंगळागौर कार्यक्रम

सचिवालय जिमखाना नृत्य विभागातर्फे मंगळागौरीचा कार्यक्रम दिनांक ५ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आला. पारंपरिक वेशभूषा तसेच पारंपरिक गीत-नृत्याने हा कार्यक्रम साजरा केला गेला. सदर कार्यक्रमासाठी राजेश मांजरेकर (ढोलकी), सुनिल इंगळे (तालवाद्ये), भरत लब्दे (हार्मोनियम) यांनी साथसंगत केली.

### (२) भोंडला कार्यक्रम

सचिवालय जिमखाना नृत्य विभागातर्फे नवरात्रीनिमित्त दिनांक २६ सप्टेंबर, २०२५ रोजी भोंडला कार्यक्रम साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी राजेश मांजरेकर (तबला), सुनिल इंगळे (तालवाद्ये), भरत लब्दे (हार्मोनियम) यांनी साथसंगत केली.

### (३) रास गरबा कार्यक्रम -

सचिवालय जिमखाना नृत्य विभागातर्फे दिनांक १० ऑक्टोबर २०२५ रोजी रास गरबा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

### (४) अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय शास्त्रीय नृत्य (कथ्थक) परीक्षा

सचिवालय जिमखाना नृत्य विभागातर्फे अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय शास्त्रीय नृत्य (कथ्थक) परीक्षेस बसलेल्या प्रशिक्षणार्थींचा निकाल खालीलप्रमाणे :-

| प्रशिक्षणार्थींची नावे | परिक्षा | वर्ष | श्रेणी |
|---|---|---|---|
| मृणाल सावंत | प्रारंभिक | एप्रिल २०२५ | प्रथम श्रेणी |
| सारिका चौधरी | प्रारंभिक | नोव्हेंबर २०२५ | प्रथम श्रेणी |

### (५) आंतरकार्यालयीन नृत्य स्पर्धा

सचिवालय जिमखाना नृत्य विभागातर्फे दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी आंतरकार्यालयीन नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदर स्पर्धेत विजयी झालेले कलाकार खालीलप्रमाणे :-

| | |
|---|---|
| **एकल नृत्य**<br>प्रथम - प्रणिता सुजी | **दुहेरी नृत्य**<br>प्रथम - मंगल नाखवा, प्रितेश रावराणे |
| द्वितीय - शुभांगिनी पाटील | द्वितीय - संपदा दाते, ज्योती दाते |
| **शास्त्रीय नृत्य**<br>प्रथम - संपदा दाते | **समुह नृत्य**<br>प्रथम - सारीका मेंढे, निलिमा जाधव,सोनाली सोलसुरकर, मोनिका गावडे, रोशनी मोरे |
| द्वितीय - मंगल नाखवा | द्वितीय - केतकी शिंदे, प्रणिता सुजी, माधुरी हंकारे |

## अखिल भारतीय नागरी सेवा लघुनाट्य स्पर्धा २०२५-२६

दिनांक २० ते २५ मार्च, २०२६ या कालावधीत अखिल भारतीय नागरी सेवा लघुनाट्य स्पर्धा सन २०२५-२६ चे आयोजन चाणक्यपुरी, दिल्ली येथे करण्यात आले होते. सदर स्पर्धेत एकूण 22 संघांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेत महाराष्ट्र राज्याच्या संघाने सादर केलेल्या "निर्णय" या लघुनाट्याला "सुवर्ण पदक" प्राप्त झाले आहे.

या लघुनाट्यातील उत्कृष्ट कामगिरीसाठी खालील कलाकारांना गौरविण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| श्रीमती अपर्णा जाधव | सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक | सुवर्ण पदक |
| श्रीमती दिपिका महाजन | सर्वोत्कृष्ट मुख्य अभिनेत्री | सुवर्ण पदक |
| श्रीमती मंगल नाखवा | सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री | सुवर्ण पदक |
| श्री. यतिन तोसकर | सर्वोत्कृष्ट अभिनेता | रजत पदक |
| "निर्णय" | सर्वोत्कृष्ट निर्मिती | सुवर्ण पदक |

या लघुनाट्यात सर्वश्रीमती अपर्णा जाधव, सुजाता शिंदे, धनश्री चव्हाण, संगिता कुडाळकर, सर्वश्री दत्तात्रय राऊत, दिवाकर मोहिते, प्रल्हाद चिगळे, मंजितसिंग राजपुत, विशाल कांबळे, आदित्य सावंतदेसाई, आशिष पवार या कलाकारांनी सुध्दा उत्तम अभिनय केला. तसेच, श्री. अरविंद शेटे व श्री. अनिरुध्द देशपांडे यांनी तांत्रिक बाजू सांभाळली. या सर्व कलाकारांनी मिळून सादर केलेल्या "निर्णय" या लघुनाट्याने एकूण ६ पदके मिळवून एकूण १४ गुण प्राप्त केल्याने महाराष्ट्र शासनास अखिल भारतीय नागरी सेवा संगीत, नृत्य व लघुनाट्य स्पर्धा २०२५-२६ चे सांघिक विजेते पद (चॅम्पियन ट्रॉफी) मिळण्यामध्ये मोलाची मदत झाली.

## ६४ वी हौशी मराठी राज्य नाट्य स्पर्धा

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या विद्यमाने दरवर्षी मराठी राज्य नाट्य स्पर्धा आयोजित करण्यात येते. या स्पर्धेमध्ये सचिवालय जिमखाना नाट्य विभागाचा नियमित सहभाग असतो. सन २०२५-२६ या वर्षातील ही स्पर्धा जानेवारी, २०२६ मध्ये साहित्य संघ मंदिर, गिरगांव, मुंबई येथे संपन्न झाली. सदर स्पर्धेमध्ये एकूण २२ संघांनी सहभाग नोंदविला होता. सचिवालय जिमखान्याच्या वतीने श्री. प्रल्हाद जाधव लिखित व श्री. सुगत उथळे दिग्दर्शित "अंबे गोंधळाला ये" हे नाटक दिनांक २९ डिसेंबर, २०२५ रोजी सादर करण्यात आले. या नाट्य प्रयोगामध्ये सचिवालय जिमखान्याचे सभासद सर्वश्री श्री. अरविंद शेटे, श्री. अजित शिंदे,

श्री. अनिल तांबे, श्री. दिवाकर मोहिते, श्री. सुधीर वेदपाठक, श्री. विशाल जोंधळे, श्री. सुनिल इंगळे, श्री. कालिदास बांदकर, श्री. संदिप यादव, श्री. विशाल काळे, श्री. आशिष पवार, श्री. यश बांदकर, श्रीमती मंगल नाखवा, श्रीमती अश्विनी लांभाते, श्रीमती अनुया सावंत, श्रीमती प्रणिता सूजी, बालकलाकार कु. आरोही बसर्गी आणि श्रीमती अपर्णा जाधव यांनी उत्कृष्ट अभिनयाने प्रयोगात रंगत आणली.

या प्रयोगासाठी नेपथ्यकार श्री. सूर्यकांत घरत आणि श्री. देवदत्त राऊत, रंगभूषाकार श्री. राजेश चव्हाण, संगीत श्री. अक्षय धांगट, वेशभूषा श्री. दिवाकर मोहिते हे होते. सचिवालय जिमखाना संगीत विभागातील सर्वश्री भरत लब्दे, राजेश काळे, विजय गोसावी, सर्वश्रीमती कनिका जाधव, नलिनी तालणकर, निता कुरणे व गुरु श्रीमती क्षितीजा वेदपाठक यांचेही सहकार्य लाभले. पडद्यामागचे कलाकार श्री. यतिन तोसकर, श्रीमती साधना मोंडकर आणि निर्मिती प्रमुख श्रीमती अपर्णा जाधव तसेच सचिवालय जिमखाना कार्यकारिणी सदस्य यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## आंतर कार्यालयीन एकपत्री/द्विपात्री अभिनय स्पर्धा

सचिवालय जिमखाना सभासदांकरीता आंतर कार्यालयीन क्रीडा व कला स्पर्धा २०२५-२६ अंतर्गत नाट्य विभागामार्फत दिनांक ११ मे, २०२६ रोजी एकपात्री आणि व्दिपात्री अभिनय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. सदर स्पर्धेत खालील कलाकार सभासद विजेते ठरले.

| **एकपात्री अभिनय** | **महिला** | **पुरुष** |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | श्रीमती मंगल नाखवा | श्री. सुनिल इंगळे |
| द्वितीय क्रमांक | श्रीमती अपर्णा जाधव | श्री. दिवाकर मोहिते |

| **द्विपात्री अभिनय** | | |
|---|---|---|
| प्रथम क्रमांक | श्रीमती अपर्णा जाधव | श्री. वेदपाठक |
| द्वितीय क्रमांक | श्रीमती मंगल नाखवा | श्री. दिवाकर मोहिते |

## अखिल भारतीय नागरी सेवा योग स्पर्धा २०२५-२६

चंदिगड येथे अखिल भारतीय नागरी सेवा योग स्पर्धा २०२५-२६ चे आयोजन दिनांक १७ ते २१ मार्च, २०२६ या कालावधीत करण्यात आले होते. सदर स्पर्धेत महाराष्ट्र शासनाच्या योग पटूंनी खालीलप्रमाणे पदके मिळवून केलेल्या नेत्रदिपक कामगिरीचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. दत्ताराम सावंत | पुरुष सोलो आर्टिस्टिक ५० वर्ष वरील गट | सुवर्ण पदक |
| २ | श्रीम. लता शिरसाठ | महिला सोलो ट्रेडिशनल ५० वर्ष वरील गट | रजत पदक |
| ३ | श्री. दयानंद बिडवे | पुरुष सोलो ट्रेडिशनल ४० ते ५० वर्ष गट | कांस्य पदक |
| | | पुरुष सोलो आर्टिस्टिक ४० ते ५० वर्ष गट | कांस्य पदक |
